स्थापना १९१६



साईबाबांच्या मूर्ती,

पूजेची भांडी

व

चांदीचे

सोन्याचे

मोत्यांचे

सर्व प्रकारचे दागिने तयार करणारी मुंबईतील विश्वासू

सुप्रसिद्ध पेढी

# ई. आर. मालपेकर,

जितेकर चाळ, ठाकुरद्वार, मुंबई नं. २

टे. नं. ३५५७३१



## श्री साई वाक्सुधा

स्वतः कोणाचीही निंदा नालस्ती करून आपण जशी जीभ विटाळूं नये त्याचप्रमाणें कोणी कोणाची निंदा करीत असेल ती ऐकूनही आपण आपले कान विटाळूं नयेत. जिव्हा डोळे व कान अगदीं स्वच्छ, पवित्र ठेवावेत. हजारों कोसांवर अशी एखादी घटना घडली तरी तिचा सुगावा बाबांना लागत असे व तशा व्यक्ति आपल्यासमोर आल्या असतां ते त्याबाबतींत शक्य त्या मार्गानें जरूर ती जाणीव करून देत असत. थोडक्यांत म्हणजे निंदा नालस्तीचे बाबांना वावडें होतें.

—श्रीसाईसच्चरित्


# श्रीसाईलीला

[ शिरडी संस्थानचें अधिकृत मासिक ]

वर्ष ४४ वें ] जून १९६६ [ अंक १५ वा

: संपादक :

श्री. बी. जी. पोतनीस

वार्षिक वर्गणी रु. ५ (ट. ख. सह)

टे. नं. ४४३३६१

: कार्यालय :

साई निकेतन, डॉ आंबेडकर रोड, खोदादाद सर्कल जवळ, प्लॉट नं. ८०, बी, दादर, मुंबई १४.

# प्रिय वाचक—

दुसऱ्यासाठीं कोणत्याहि प्रकारचा त्याग करणें हा एक अत्यंत महत्त्वाचा दैवी गुण आहे. त्याग सर्वांकडून सहसा घडत नाहीं. ज्यांच्या ठिकाणीं सात्वीक भाव, परोपकार, बंधुभाव व दुसऱ्यासाठीं झटणें या भावना वास करीत असतील तेथेंच त्याग भावनेचा संभव असतो. त्यागामुळें मानव देवासन्निध जाण्याच्या मार्गावर असतो. म्हणजे देवाला आपल्या त्यागभावनेच्या बळावर तो जवळ जवळ आणीत असतो.

स्वार्थ आमच्या बारशाला पुजलेला आहे. मी माझी बायको आणि माझीं पोरें-बाळें. यापलिकडे आम्हांला दुसरें जग नाहीं. त्याच कोंडवाड्यांत आम्ही स्वतःला कोंडून घेतलें आहे. त्यांच्यापुरतें व स्वतःपुरतें पाहिलें म्हणजे आमचें कर्तव्य संपलें. खरें पहातां ही केवळ पशुवृत्ति आहे. हें एवढें ज्ञान पशुपक्षांनाहि असतें. नाहीं का? मनुष्य जन्मला येऊन आम्हीं त्यांच्या पलिकडे गेलें पाहिजे. त्याच्या पल्याड केवढें तरी विशाल जग आहे. त्या जगांत घोर अज्ञान, खडतर दारिद्य व अगणीत रोग यांचें वास्तव्य आहे. त्यांच्याशीं सामना देतां देतां असंख्य लोक बेजार होत असतात. त्यांना आपलें जिणें जगणें असह्य झालेलें असतें. तें सुसह्य करण्यासाठीं पुढें सरसावणें, व इतरांसाठीं जें जें करणें शक्य असेल तें करण्यासाठीं बद्धपरिकर होणें याचें नाव माणुसकी. परंतु ही माणुसकी आपल्या मानगुटीवर केव्हां बसेल? आपल्याठायीं बंधुभाव निर्माण होईल तेव्हां. इतरेजनास दुःखमुक्त करणें, त्यांना सुखी करणें हेही माझें एक परमपवित्र कर्तव्य आहे याची जाणीव होईल तेव्हां.

या जगांत आजकाल पूजा कशाची होते? धनाची व धनवंताची! ज्यांच्याजवळ धनसंपदा आहे त्याला समाजांत जास्तीत जास्त मान. त्याच्या अंगी असले नसलेले सारे गुण बळेंच आणून चिकटविले जातात. त्याच्यांत दोष कितीही असोत ते सारे झांकले जातात. हा कशाचा प्रभाव? संपत्तीचा!

आणि त्यामुळें होतें काय? समाजांत संपत्तीवानाची पूजा होते. मग भल्याबुऱ्या मार्गांनीं चोरी, लबाडी, काय वाटेल तें करून पैसा मिळविण्यासाठीं, श्रीमंत होण्यासाठीं झटावयाचें. अशा प्रकारचा समाजाची हानी करणारा आदर्श लोकापुढें ठेविला जातो.

दुसऱ्यांचा पैसा, चोरी, लबाडी किंवा हातचलाखी करून लुबाडणें, खोट्याला खरें मानणें, डाकूगिरी करणें काळाबाजार करणें, स्वतःची तुंबडी भरण्यासाठीं व्यापार धंद्यांत वाटेल तसा नफा मिळविणें या गोष्टी, हें पापाचरण मग राजरोस होऊं लागतें. त्या दुर्गुणांना सद्गुणांचे स्वरुप येऊं लागतें.

यापेक्षां हीन अवस्था दुसरी कोणती असणार ?

तेव्हां धनसंपदेला वाजवीपेक्षां फाजील महत्त्व देणें अहितकारक आहे. महत्त्व देण्यांत आलें पाहिजे सदाचाराला, परोपकारवृत्तीला, धर्मनिष्ठेला, नीतिमत्तेला व त्यागवृत्तीला.

समाजाला व व्यक्तीला उच्चस्थानावर बसविणारे हे सद्गुण आहेत. समाजांत त्यांची पूजा झाली पाहिजे. समाजांत त्या सद्गुणांस मानाचें स्थान मिळालें पाहिजे.

समाजांत माननीय कोण ? धनवान् नव्हे तर जो दुसऱ्यांसाठीं झटतो, वाट्यास येईल तो त्याग करतो, न्यायनीतीनें व धर्मानें वागतो तो.

धनाशिवाय आपलें कसें चालेल ? नीतिधर्माच्या मर्यादा संभाळून आपण धनसंपदा अवश्य मिळविली पाहिजे. पण ती कशासाठीं ? केवळ आपण आणि आपली बायको मुलें यांच्यासाठींच नव्हे तर जे अडचणींत, संकटांत व दुःखांत असतील त्यांच्यासाठीं वेळप्रसंगीं हात वर करतां यावा, त्यांच्यासाठीं त्याग करतां यावा, यासाठीं.

आम्ही जगांत थोर व मौल्यवान् कशाच्या बळावर ठरूं ? लाख दोन लाख रुपये आपल्या पोराबाळांसाठीं ठेवले एवढ्यावर जग आपणास मोठेपणा देणार नाहीं तर इमानेइतबारें जें कांहीं मिळविलें, त्याचा गरजवंतासाठीं, जनतेच्या सुखसमाधानासाठीं व विकासासाठीं ज्या प्रमाणांत आम्हीं विनियोग करण्याची तयारी दाखवूं, त्याप्रमाणांत, आपण जन्मा आलियाचें सार्थक केलें असें निश्चितपणें म्हणतां येईल.

या ठिकाणीं तुमच्या आमच्यांत कालपरवांपर्यंत वावरून इहलोक सोडून गेलेले खऱ्या उदार वृत्तीचे रँगलर आर. पी. परांजपे यांचें उदाहरण देतां येईल. आज त्यांच्याबद्दल सर्वांकडून धन्योद्गार निघत आहेत. जन्माला येऊन या जगांत खूप कर्तृत्व गाजविलें व काटकसरीनें जवळ जी लाखभर रुपयांची माया ( रहातें घर जमेस धरून ) केली तिचा विनियोग ज्या भूमीत आपला जन्म झाला त्या भूमीतील लोकांच्या सुखासाठीं व विकासासाठीं व्हावी. त्यांतील यत्किंचीतही भाग आपल्या एकुलत्या एक मुलीला किंवा लाडक्या नातीला व्हावा अशी इच्छा त्यानी दर्शविली नाहीं.

याला म्हणतात खऱ्या अर्थानें थोर माणूस.

या उदाहरणावरून किती तरी गोष्टी शिकण्यासारख्या आहेत. आम्ही स्वार्थापलिकडे जाण्याचा अविरत प्रयत्न करूं या. त्याग, जो आपल्या हातून होईल, तो त्याग करण्यासाठीं बद्धपरिकर होऊं या आणि त्यासाठीं श्री साईबाबांचें सहकार्य संपादन करून घेऊं या.

—संपादक

# बाबांची सगुण भक्ति

लेखक : द. शं. टिपणीस

" माझी मंत्रतंत्र शास्त्रोक्त पूजा आवड म्हणून जरी केलीत तरी माझें लक्ष तिकडे नसतें. मुंग्या वा डोंगळे साखर किंवा गुळाच्या शोधांत असतात तसा मी तुमच्या हृदयाच्या शोधांत असतों. ज्या ठिकाणीं भक्तीचा गोडवा मला आढळतो; त्या ठिकाणीं मी ओढला जातों, तेथें डोंगळ्यासारखा चिकटून रहातों. मग भक्तानें मला सोडलें तरी मी भक्ताला सोडीत नाहीं."

सगुण भक्ति व निर्गुण भक्ति, सगुण पूजा व निर्गुण पूजा. असे प्रकार आहेत. त्यांत सगुणापेक्षां निर्गुण भक्ति व पूजा श्रेष्ठ समजली जाते. निर्गुणाचा मार्ग सगुणांतून जातो. शंकराकडे जाण्यासाठीं नंदीजवळून जावें लागतें. म्हणून पहिले वंदन नंदीला व नंतर शंकराला ही रीत आहे. पण मानवी स्वभावाची विशेषतः हिंदु स्वभावाची गंमत ही कीं, आपण नंदीला वंदन करतों व शंकराला विसरून जातों. सगुण भक्ति करतों पण त्या सगुणांतल्या निर्गुणाकडे लक्ष जात नाहीं. देवळांत गेलों कीं आपणास सुंदर मूर्ति दिसते, तिचा मोहक चेहरा आवडतो, पोशाख व एकंदर पुजेमुळें निर्माण झालेला सुंदरपणा आपणास आकर्षित करतो व म्हणतों किती छान संगमरवरी मूर्ति आहे, हसमुख आहे, नाहीं? आणि नमस्कार करतो. मनांत काय भरलें? तर मूर्ति, पोशाख व गोमटें साजिरें रूप, पण या साजिरे मागचें सुंदर, हास्या-मागील आनंद व मूर्तींत असलेलें सत्य यांची, सच्चिदानन्दाची पुसटशी तरी कल्पना अशा वेळीं आपल्या मनांत येते काय? फार क्वचित होत असेल. सर्वसाधारणपणें बाह्यांगावर आपली दृष्टी खिळून राहते. सगुणा-भोंवतीच आपली भक्ति पिंगा घालीत राहते. शंकराच्या देवळांत जाण्याची व शंकराला वंदन करण्याची विस्मृति होते. निर्गुण सगुणांत कोंडून ठेवून सगुणाचीच उपासना आपण सदैव करीत राहतों. त्या निर्गुणाला आपल्या व्यवहारांत आणण्याचा व पहाण्याचा आपण प्रयत्नच करीत नाहीं. कालांतरानें निर्गुणाचा विसर पडून सगुण

हेंच निर्गुण समजून त्यांतच आपण रमून जातों व अनेक वर्षांच्या भक्तिनंतर आपण ज्या पायरीवर असावयास पाहिजे त्या पायरीपासून आपण फारच दूर असतों.

## मानवी मनाचा लंगडेपणा

सगुण भक्तिमुळें सगुणांतच स्थिरावून राहणें हा मानवी मनाचा लंगडेपणा आहे. या लंगडेपणांतून आणखी एक पांगळेपणा जन्मास येतो. आपल्या दैवताची एकाद्या मूर्तींत वा प्रतिकांत स्थापना केली व तिच्यासंबंधानें करावयाचें तें सर्व शास्त्रोक्त पूजादि प्रकार केले कीं भक्ति पूर्ण झाली, आतां दुसरें कांहीं करावयास नको असें सगुणभक्तिमुळें वाटून मनाला एकप्रकारचा वैचारिक पांगळपणा येतो. डोळ्यांना दिसतें तेंच खरे मानणारे आम्ही. सगुणभक्तींत रमणाऱ्या हिंदु मनाला नानातऱ्हेची नवीन नवीन देवळे निर्माण करण्याची भारी हौस. माणसागणीक देवदेवळे निर्माण होत असतात. ज्याला त्याला माझ्याच देवळांत राम आहे हा अभिमान फक्त. पण त्याच्याच देवळांतील रामाची मात्र याला मुळींच ओळख नसते. काखेंत कळसा व गांवाला वळसा अशी आहे स्थिती. मृगजळाला समजून आपण पूजा करीत राहतो. मृगजल आहे गंगाजल नव्हे ही जाणीव अनेक अध्यात्मिक ग्रंथ वाचूनही आम्हांस होत नाहीं; कारण तसा प्रयत्नच आम्हीं करीत नाहीं. उत्सवप्रियता व थाटमाट हा आमचा स्वभावधर्म, यामुळे अर्थाअर्थी संबंध नसलेल्या अनेक कल्पना व रुढी अध्यात्मांत घुसतात व 'मूळ' बाजूला राहून खुळ हेंच मुळाच्या योग्यतेचे होऊन बसते. एस. एस. सी. ( सगुण ) हीच ज्ञानाची मर्यादा समजून ती झाल्यावर फत्ते झाली अशा खुषींत व ऐटींत आपण व्यवहारांत वागत असतो, असाच कांहींसा प्रकार आपल्या धर्मांत व थोडाफार इतरही धर्मांत होऊन बसला आहे.

## सगुणाचें महत्त्व

वरील विवेचनावरून एक गैरसमज होण्याचा संभव आहे. सगुण भक्तींत दोष आहेत यास्तव तिचा उपयोग नाहीं असा दृष्टीकोन वरील विवेचनांत असावा असें वाटणे शक्य आहे. परंतु वरील प्रकारचें विवेचन करण्यांत कांहीं उद्देश आहे तो पुढें स्पष्ट होईल. हें सत्य आहे कीं सगुणभक्ति ही अध्यात्मांतील एक जरुरीची गोष्ट आहे. सगुणभक्तीखेरीज निर्गुण भक्तींत शिरणें सर्वसाधारण माणसाला अशक्य आहे. सगुणाची पायरी चढल्याखेरीज निर्गुणाच्या दालनांत प्रवेश होणें कठीण आहे. S. S. C. झाल्याखेरीज कां सर्वसाधारण माणसाला पदवीधर होतां येईल ? यामुळें सगुणाचें महत्त्व निर्विवाद आहे. प्रश्न आहे तो आपण सगुण भक्ति कशी हाताळतो याचा. जग ही माया आहे. मृगजळ आहे. क्षणभंगुर आहे. सत्य नाहीं वगैरे सगळें खरें असलें तरी जोंपर्यंत मानवी देहाच्या आधारें आपण जीवन

जगत आहोंत तोंपर्यंत हा सर्व पसारा खराच आहे असें समजून सर्व व्यवहार करणें प्राप्त आहे. आग लागलेल्या घरांत ही सर्व माया आहे, भ्रम आहे असें म्हणून जर कोणी शिरू पाहिलं तर त्याला चटके बसल्याखेरीज कसे राहतील ? आपल्या भोवताली जी परिस्थिती आहे ती तशी आहे असें समजूनच जीवनांत वाटचाल केली पाहिजे. ही वाटचाल करतांना आपला मार्ग आपणास केव्हांना केव्हां तरी शाश्वत सुखाकडे नेईल कीं नाहीं याची वेळोवेळीं तपासणी केली पाहिजे व त्याबाबतींत सदैव जागरूक राहिलें पाहिजे. जीवन व्यतीत करण्याचा हा दृष्टीकोन सगुण भक्तानें आपल्या भक्तींतही ठेवला पाहिजे. जी आपणास शाश्वत सुखाकडे, निर्गुणाकडे, जें कांहीं मूळ त्याकडे आज ना उद्यां नेईल अशी भक्ति आपल्या हातून होत आहे कीं नाहीं याकडे सगुण भक्तानें सदैव लक्ष ठेवले पाहिजे.

## माया फसवी व चकवी

आपलें सगुण हें कांहीं झालें तरी मायेचाच आविष्कार आहे व माया ही फसवी व चकवी असल्यामुळें नको तोच आपला देव व ध्येय होऊन बसण्याचा संभव आहे हें विसरून उपयोगी नाहीं. सगुण भक्तींत मूळ देव देव्हाऱ्यांत राहून त्याच्या आवतींभोंवतीं चालणाऱ्या बाह्य गोष्टींना फाजील महत्त्व येऊन आपलें मन त्यांतच रमून जातें व आपण खऱ्या भक्तीला मुकतो. सगुण भक्तींत जे कांहीं धोके आहेत कीं ज्यामुळें अध्यात्मिक प्रगति खुंटू शकेल. ते धोके टाळण्याकडे भक्तानें कसोशीनें लक्ष दिलें पाहिजे. घरोघर चालणारी व देवळांतून होणारी सगुण भक्ति आपण तपासून पाहिली तर सगुण एका बाजूला, भक्ति दुसऱ्या बाजूला व चाललेले व्यवहार तिसऱ्याच बाजूला असें दिसून येईल. सगुण भक्तींतील दोष व त्यामुळें सगुणाची होणारी अवस्था याची पूर्ण जाणीव साईबाबांना होती. आपल्या मागें आपल्या सगुण भक्तीची व आपली शतकानुशतकें होत आली आहे तशी अवस्था होऊं नये म्हणून बाबांनीं आपल्या भक्तांना जो इशारा देऊन ठेवला आहे व जो एक निश्चित मार्ग आंखून दिला आहे त्याचा विचार करणें हा जो या लेखाचा मुख्य उद्देश त्याकडे वळण्यापूर्वी सगुण भक्ति आपण कशाप्रकारें करीत आहोंत हें काळजीपूर्वक तपासल्यास बाबांचें सांगणें व आपलें करणें यांतली तफावत चांगली लक्षांत येईल.

## जगाचें रहाटगाडगें चालूच

हिंदु धर्मांत जेवढे देवाचे व संतांचे अवतार निर्माण झाले आहेत तेवढे अन्य धर्मांत आढळून येणार नाहींत. दोन अडिचशें वर्षांच्या कालखंडास एक संत असें सर्वसाधारण प्रमाण पडतें. अनेक संत झाले. त्यांनीं लोकांना मार्गदर्शन केलें तरी पुन्हा पुन्हां मार्गदर्शन करण्यासाठीं संतांना यावें लागतें व देवाला अवतार घ्यावा

लागतो. शेंकडों वर्षें असें चाललें आहे. संतांनीं यावें, लोकांना शहाणे करून सोडावे, ते सोडून गेल्यावर लोकांनीं सर्व सोडून पुन्हा कोरे ते कोरे व्हावें, हें रहाटगाडगे चालू आहे व त्यांतील पाणी उपळ्या घळ्यावर पडत आहे. संतावतार होतात व जातात. मागें काय रहातें ? त्यांची मूर्ति, प्रतिमा, छबी, पोथी ग्रंथ. मूर्तींची पूजा होते. पुण्य-तिथ्या व जयंत्या उत्साहानें साजऱ्या होतात. पोथीची पारायणें होतात. संताच्या मागें त्यांची भक्तमंडळी न विसरता या गोष्टी करीत असतात. पण त्यांचा उपदेश, त्यांची शिकवण विस्मरणांत तेवढी शिल्लक ठेवतात. यांत हल्ली थोडी सुधारणा झाली आहे. संतांच्या उपदेशाची शिकवणीची जाणीव एकाच्या द्वारें दुसऱ्यांना करून देण्यासाठीं प्रवचनें व व्याख्यानें होत असतात. त्यांतही ही जाणीव दुसऱ्यांना करून द्यावयाची, स्वतांची स्वताला करून घ्यावयाची नाहीं हें विशेष. शिवाय पूर्वकालीन संतांचे कांहीं ग्रंथ हें एक उत्कृष्ठ साहित्य आहे असा शोध कांहीं वर्षांपूर्वी साहित्यिकांना लागला व त्याचवेळीं या ग्रंथांतून अमोल असा ज्ञानाचा ठेवा आहे असें कांहीं पंडितांना ज्ञान झालें व यामुळें साहित्यिक व पंडिताचे फड निर्माण झाले. कोणत्या संताच्या मनांत नेमका कोणता अर्थ होता याचें एकाचवेळीं निरनिराळ्या साहित्यि-कांना व पंडिताना निरनिराळे ज्ञान झाल्यामुळें त्यांच्यांत 'अर्था'साठीं वादावादीच्या वावड्या उडूं लागल्या. याचा फायदा म्हणजे कांहीं पी. एच. डी. होऊन गेले. सध्या जरा आघाडीवर सामसूम आहे. कदाचित थकण्यामुळें विश्रांति असेल. पुन्हां केव्हां वावटळ उठेल व त्यांत कोणता ग्रंथ सांपडेल याचा नेम नाहीं. प्रखर विद्वत्तेच्या व बुद्धिमत्तेच्या उन्हांत धार्मिक ग्रंथामागील भावना वाळवून सुकवून व करपवून टाकल्यानें अध्यात्मिक प्रगती किती होईल याचा बुद्धिमंत विचारही करीत नाहींत. अध्यात्मांत बुद्धिपेक्षां भावना महत्त्वाची आहे. डोळसपणें अध्यात्मांत वावरता यावे यासाठीं बुद्धीचा वापर जरूर असला तरी वादावादीच्या वावटळीमुळें बुद्धिभेद होऊन कार्यहानी होते. सगुणभक्तीला याची झळ लागली कीं ती निरुपयोगी होते. पांडित्याच्या या गोंधळांत सामान्य जनतेला कांहींच कळेनासें होऊन ती बिचारी ग्रंथाला फूल वाहून व नमस्कार करून आपली सगुण भक्ति व्यक्त करून मोकळी होते. संतग्रंथ हे केवळ विचारासाठीं नसून आचारासाठीं असतात याची दखलल या गोंधळांत कोणी फारशी घेत नाहीं कीं त्या संबंधानें सामान्य जनतेला मार्गदर्शन करीत नाहीं. यामुळें इंजिन सुटून गेलेल्या डब्यांप्रमाणें आमची अध्यात्मांत प्रगती होते व पुन्हां आम्ही कोरडे ते कोरडेच राहतो.

### आमची विभूतिपूजा

हिंदुधर्मीयांचा आणखी एक हातगुण आहे. तो त्यांचा स्वभावधर्म आहे. तो म्हणजे विभूति पूजा. कोणालाहि विभूति बनवून त्याची पूजाअर्चा व उदो उदो

करण्यांत हिंदु मनाइतके कुशल मन नसेल. विभूती पूजा नसावी असें नाहीं. पण आपण अतिरेक करतो. एकाद्या ओबडधोबड धोंड्यालाहि देव करण्याचें ज्यांचे सामर्थ्य आहे ते जिवंत मानवी व्यक्तीला देवत्वाला चढवूं शकतात यांत कांहींच आश्चर्य नाहीं. दगडाला शेंदूर फासून त्याला देव करण्याच्या आमच्या या सामर्थ्यामुळें पुष्कळवेळां मारुती कोणता व म्हसोबा कोणता हें ओळखणेंहि कठीण जातें. अशावेळीं छप्पर असलें तर मारुती उघड्या माळ्यावर असला तर म्हसोबा असें आपण समजून घ्यायचें एवढेंच. चारचौघांनीं मनांत आणलें की ते कोणालाहि अखिल ब्रह्मांडनायक करूं शकतात व त्याचा उदोउदो करून सर्व शास्त्रसंमत पूजादी प्रचार चालू होऊन सगुणभक्तीचा जल्लोष सुरूं होतो. आम्ही हिंदु God makers आहोंत. आजपर्यंत इतके ब्रह्मांडनायक झाले आहेत व आज आहेत कीं तें पाहिल्यावर ब्रह्मांडें किती आहेत व त्यांचे नायक किती हें कोडें सुटत नाहीं.

## हानीकारक वृत्ति

देव निर्माण करण्याच्या आमच्या या वृत्तीप्रमाणेंच दुसरी एक वृत्ति सगुण-भक्तींत वावरत असते. ती अधिक हानिकारक व कार्यविघातक आहे. देवाला देवळांत स्थापून त्याच्या सगुणभक्तीचा सर्व थाट उडवून मग त्या देवाला देवळांतच बंदिस्थ करून ठेवण्याची म्हणजे देवाला आपल्या व्यवहारांत न येऊं देण्याची वृत्ति अध्यात्माला फारच हानिकारक आहे. कारण यामुळें बाह्यांगाच्या भक्तींतच आम्ही गुंग होऊन अंतर्गत भक्ति व सदाचार याला पारखे होतों. देवादिकांचें अवतार संतमहंत वा उच्च विभूती यांची देवळे व समाध्या निर्माण करून सगुणभक्तीचा थाट उडवून देण्यांत आमच्याइतका कोणाचाही हातखंडा नसेल. यांत आम्हीं इतके रमतो कीं संतांच्या उपदेशाकडे दुर्लक्ष होऊन अंती आमची भक्ति कोरडीच रहाते; कारण तिला सदा-चाराचा ओलावा मिळत नाहीं, संतमहात्म्यांचा उपदेश आपण विसरून जातों. त्यांनीं दाखविलेला मार्ग सोडून पुन्हां आडमार्गानें चालू लागतो व त्यांनीं जें कांहीं कार्य केलें असेल त्याचा विचका होतो. हें असें शतकानुशतकें चालू आहे. असें कां व्हावें ?

## आमचा स्वार्थ व अहंकार

संतांचा उपदेश आचरणांत आला तर आपलें कसें होईल ही चिंता स्वार्थ व अहंकार यांना पडते व संतांच्या उपदेशाप्रमाणें आचरण घडूं न देण्याची ते खटपट करतात. सर्वसाधारण माणसावर त्याला उमगत नसले तरी स्वार्थ व अहंकाराचा पगडा असतो. पडद्याआड राहून हे बेटे आपली तहान माणसाला नाना गोष्टी करायला लावून भागवून घेत असतात. उच्च विभूती, साधुसंत हे आपल्या स्वार्थाच्या आड

येतात. त्यांना चार हात दूर ठेवल्यानें व आपल्या व्यवहारांत त्यांना शिरूं न दिल्यानें स्वार्थ व अहंकार यांचें व्यवस्थित चालते. अरे, साधुसंत फार मोठे, तुझ्यासारख्या पामराला कां त्यांच्याप्रमाणें करतां येईल वा वागतां येईल ? असा प्रचार स्वार्थ व अहंकार करीत असतात. देव देवळांत ठेवला व त्याला व्यवहारांत येऊं दिला नाहीं म्हणजे आपलें सर्व भागेल हें ओळखून या गोष्टी सागसाला करावयास ते लागतात, आणखी माया यांच्या मदतीला येते. हें व्यक्त जग व्यक्तच ठेवणें हें तिचें काम. त्यासाठी नाना व्यवहार हरघडी या जगांत होत राहिले पाहिजेत म्हणून नाना आभास उत्पन्न करून अगर क्षणैक तात्पुरत्या सुखाच्या मागें स्वार्थ व अहंकार यांना गुंतवून ती जगाचें रहाटगाडगें सारखे फिरतें ठेवते.

## सर्वांची धडपड ऐहिक सुखासाठीं !

शिर्डीला वा अन्य क्षेत्राच्या ठिकाणी जी असंख्य गर्दी होते तींत खरे भक्त फारच थोडे मिळतील; कारण बरेचसे आपल्या स्वार्थाची पूर्ती करण्यासाठीं व ऐहिक सुख मिळविण्यासाठीं आलेले असतात. यामुळें जो नवसाला पावतो त्या देवाकडे भक्तांची रीघ लागते. नवीन एकादा साधुसंत आला कीं त्याच्या भोंवतीं हमखास गर्दी जमायची, कारण त्याच्याकडून आपणास कांहीं तरी मिळेल ही आशा. यामुळें संतांच्या कार्याची त्यांच्या नंतर बदाम जाऊन टरफळ राहिलें अशी अवस्था होते. सगुण भक्तींत आणखी एक दोष शिरलेला आहे व तो म्हणजे मध्यस्थाची जरुरी. भक्तिमध्यें वास्तविक देव भक्त यांचा संबंध असतो. त्यांत तिसऱ्या व्यक्तीचा संबंध नाहीं. भक्तानें निष्ठेनें व भावनेनें केलेली अगदीं साधी पूजा सुद्धां देवाला पावती होते असें आमची शास्त्रें सांगतात. असें असतां सगुण भक्तींत भक्ताची पूजा देवाला पावती करून देणाऱ्या मध्यस्थाची जरूर लागते. दुसरे असें कीं सगुण भक्तींत भक्त हा आपल्या आवडीनावडी देवावर लादत असतो. असें करण्यामध्यें देवासंबंधीं प्रेम वा वात्सल्य असते. एकाचें पाहून दुसऱ्यानें करावें या स्वभावधर्माप्रमाणें इतरही तसेंच करूं लागतात. या कोरड्या अनुकरणामुळें नानातऱ्हेच्या रूढी कीं ज्यांचा भक्तीशीं अर्थाअर्थी कांहीं संबंध नाहीं, सगुण भक्तींत निर्माण झाल्या आहेत. एक काळ असा होता कीं त्यावेळीं साक्षरता ठराविक वर्गांतच होती. हे लोक वेदविद्येमध्ये प्रवीण होते व निरक्षर व अज्ञानी जनता धर्मासंबंधी मार्गदर्शन करण्याचें काम त्यांच्याकडे आलें होतें व ते तें प्रामाणिकपणें करीत असत. स्वतां ते उच्च प्रतीचे भक्त असल्यामुळें कोणताही लोभ ते बाळगीत नसत. पुढें काळ फिरला. ऋषिमुनी लुप्त झाले. त्यांची जागा विद्वान पंडितांनीं घेतली. पुढें पुढें विद्वानही कमी होऊं लागले व शिल्लक राहिले अज्ञानी जनाना मार्गदर्शन—हे मार्गदर्शन हळू हळू धंदा झालें. धंदा म्हटला कीं त्यांत व्यापारी तत्त्वें आली. यामुळें भक्ती हे भक्ताचे ध्येय

असते. वास्तव पूजादी प्रकारात भाव ठरले गेले. अमुक करावयाचें तर एवढा पैसा लागेल ही भाषा ज्या योगें कमाई वाढेल असे प्रकार व रूढी सगुण भक्तीच्या भोंवती मार्गदर्शकांनीं निर्माण केल्यामुळें कांहीं कांहीं पूजा गरिबांना बंद झाल्या आहेत. देव गरिबाकडे ढुंकूनही पहात नाहीं. श्रीमंतांच्या बंगल्यांत झुलत असतो. बुद्धीला न पटणाऱ्या उपनिषदाच्या तत्त्वांशीं विसंगत अशा कित्येक गोष्टीं अध्यात्मांत शिरल्यामुळें एक प्रकारचा वैचारिक गोंधळ सर्वसाधारण मनांत निर्माण होऊन, जाऊं द्या असले कांहीं म्हणता-हेतना टाका समाधानासाठीं करून, रुढी आहे, केलं पाहिजे अशा बेफिकीर वृत्तीनें सर्वसाधारण जनता सगुण भक्तीची कदर करूं लागली आहे. देव वा संत यांचा उपयोग—आपला स्वार्थ भागविण्यासाठीं, अहंकाराला सुखविण्यासाठीं झाला तर सर्व सन्मान नाहीं तर लांब दूर देवळांत ठेवणें, उपदेश डोळ्याआड करणें, मध्यस्थाखेरीज परमार्थसाधन व भक्ति न होणें अशा प्रकारचे दोष सगुण भक्तीत शिरलेले आहेत.

## सारीं निर्गुणाचीं सगुण रूपें

सगुण भक्ति ही केवळ गुणाभोंवतींच स्थिरावून राहिली तर अध्यात्मिक प्रगतीही स्थिर होते. आपलें सगुण हे खरोखर सगुण नसून मुळांत तें निर्गुण आहे व हें अखिल ब्रह्मांड व त्यांतील सर्व प्राणीमात्र हीं आपल्या दैवताच्या मूर्तिप्रमाणें त्या निर्गुणाचींच सगुण रूपें आहेत ही जाणीव भक्ताला झाली पाहिजे. ती त्याला आपल्या व्यवहारांत भासली पाहिजे. ज्यायोगें हें साध्य होईल व ज्यांत सगुण भक्तींतील अन्य दोष येऊं शकणार नाहींत असा मार्ग पाहिजे. अशा तऱ्हेचा अगदीं साधासुधा फारसा खर्चाचा नाहीं व श्रीमंत व गरीब दोघांनाही आचरतां येईल असा मार्ग साईबाबांनीं दाखवून दिला आहे. किंबहुना असा मार्ग आपल्या भक्तांना दाखविणें व त्यांना त्या मार्गाला लावणें हा साईबाबांच्या कार्याचा मुख्य उद्देश होता. कोणत्याहि प्रकारें आपल्या भक्तांना ऐश्वर्य, मानमरातब वा पैसा उपलब्ध करून देणें हा त्यांचा उद्देश नव्हता व नाहीं. मुख्य उद्देश साध्य होण्यासाठीं साधन म्हणून त्यांनीं या गोष्टींचा कित्येक वेळां उपयोग केला असेल व आजहि करीत असतील. पण तो मूळ उद्देश नव्हे. हें सर्व नीट लक्षांत घेऊन त्यांनीं दाखविलेल्या मार्गानें आपण निष्ठेनें वाटचाल करीत राहिलों तर सगुण भक्ति वा इतर उपासना, व्रतें वगैरे करीत राहूनहि आपली आध्यात्मिक प्रगति होईल, आपली भक्ति कशी करावी या संबंधीं बाबांचे जे म्हणणें आहे त्याचा आतां थोडक्यांत विचार करूं.

## भक्तीसंबंधीं बाबांचे विचार

मानकर म्हणून बाबांचे एक निष्ठावंत भक्त होते. बाबांची ते हरएक प्रकारे

सेवा व भक्ति करीत. बाबांच्यावर त्यांचें इतकें निस्सीम प्रेम होतें कीं, क्षणभरहि ते त्यांना सोडून जाण्यास तयार नसत. शिर्डी सोडून ते कधींहि बाहेर गेले नाहींत, कारण यामुळें बाबांचें दर्शन, त्यांची सेवा यांना आपण अंतरूं अशी त्यांना भिती वाटत असे. त्यांची निष्ठा बाबा जाणत होते. पण हा वेडा आपल्या साडेतीन हाताच्या देहालाच साईबाबा समजतो, माझा देह, माझें बाह्यरूप त्याला परमेश्वर वाटते. बाबा हें देहाचें नांव असून त्याच्या आंत 'साई' आहे याची याला जाणीव नाहीं. म्हणून मी शिर्डीबाहेर कसा दिसेन याची चिंता करून हा शिर्डीबाहेर जाण्यास तयार नाहीं. सगुणांतील निर्गुणाची याला अद्याप जाणीव झाली नाहीं, ती न झाली तर माझी भक्ति करूनही याची अध्यात्मिक प्रगति विशेष होणार नाहीं. साईबाबा म्हणजे हा देह नव्हे तर त्याच्या अंतर्गत जे निर्गुण आहे तें. त्याची भक्ति व उपासना करावयास पाहिजे. साईबाबा हे केवळ शिर्डीला नसून ते सर्वत्र आहेत व भक्ताची निष्ठा व भावना तीव्र असेल तर त्याला ते कोठेंही दिसूं शकतील. आपल्या या सर्वव्यापीत्वाची जाणीव याला दिली पाहिजे. भक्ति करावयाची ती त्या सर्वव्यापीची, देहाची वा बाह्यरूपाची नव्हे. देह हें त्या सर्वव्यापीच्या सेवेचे मध्यस्थ आहे एवढेंच. मध्यस्थाला वाजवीपेक्षां ज्यादा महत्त्व दिलें तर मूळ दृष्टीआड होईल. या सर्व गोष्टी मानकरांना पटवून देण्यासाठीं एके दिवशीं बाबांनीं त्यांना सांगितलें कीं, मच्छिंद्रगडावर जा व तेथें कांहीं महिने उपासना कर. मानकर या गोष्टीस तयार होईनात. मच्छिंद्रगडावर गेल्यास आपण बाबांच्या दर्शनास मुकूं ही त्यांना भीति. पण बाबांची आज्ञा. नाहीं म्हणणें योग्य नव्हते.

## मी सर्वव्यापी, सर्वत्र आहे

ते जाण्यास तयार झाले, पण बाबास म्हणाले कीं, मी तेथें गेलों तर तुमचें दर्शन मला कसें होईल ? बाबा म्हणाले सांगतो तें कर, सर्व कांहीं ठीक होईल. मानकर मच्छिंद्रगडावर गेले व बाबांनीं सांगितल्याप्रमाणें उपासना सुरू केली. आपणास बाबा अंतरले ही रुखरुख मात्र मनाला लागून राहिली होती. पण बाबांवर निष्ठा ठेवून त्यांनीं आपली उपासना चालू ठेवली. एके दिवशीं पूर्ण जागृतींत डोळे उघडे असतां समोर बाबा उभे असलेले मानकरांनीं पाहिले. त्यांना आश्चर्य वाटलें. बाबा म्हणाले, पाहून घे. जो शिर्डीत तोच मी येथे आहे कीं नाहीं ? माझें दर्शन कधीं होईल हीच तुला चिंता होती ना ? मी फक्त शिर्डीतच आहे असें समजत होतास ना ? आशिर्वाद देऊन बाबा अदृश्य झाले. मुदत संपल्यावर मानकर परत शिर्डीस येण्यास निघाले. त्यावेळीं पुणें स्टेशनवर तिकिटाचा जो चमत्कार झाला त्यांतहि मानकराना बाबानी याचीच जाणीव दिली कीं, मी शिर्डीत आहे, मच्छिंद्रगडावर आहे, एवढेंच नव्हे तर मी धनगराच्या रुपानेहि आहे. यानंतर बाबा हे केवळ शिर्डीत

नसून सर्वत्र आहेत ही जाणीव पानकरांना होऊन शिर्डीबाहेर कांहीं दिवस राहण्यास त्यांना चिंता वाटेनाशी झाली. जेथें जातो तेथें तुझे पाय ही जाणीव त्यांना होऊन ते हळूंहळूं सगुणांतून निर्गुण भक्तींत शिरले.

'मी तुम्हां हृदयस्थ'


सगुणाची भक्ति करतांना आपलें लक्ष निर्गुणाकडे असलें पाहिजे हे बाबांनीं परोपरीनें सुचविलें आहे. दुसऱ्याच्या मनांतील विचार किंवा शिरडीपासून लांब गांवाला असलेला माणूस काय बोलला तें बाबा बरोबर सांगत असत. लोकांना हा मोठा चमत्कार वाटे. पण चमत्कार म्हणून बाबा ही गोष्ट करीत नसत तर उपनिषदां-तील एक अति मूल्यवान तत्त्व, वेदांताचें सारसर्वस्व पूर्ण खरें आहे हें भक्तांना पटवून देण्यासाठीं. तें तत्त्व म्हणजे ईश्वर सर्वत्र आहे. सर्व प्राणीमात्रांत आहे ही गोष्ट अगदीं साध्या व मोजक्या शब्दांत बाबा सांगत. 'मी तुम्हां हृदयस्थ'—मी तुमच्या हृदयांत आहे. तेथें तुम्ही मला पहा. [हृदयकुहरमध्यें केवलं ब्रह्ममात्र—हृदयाच्या गुहेमध्यें प्रत्यक्ष ब्रह्म हेंच 'मी मी' म्हणून आत्मरुपानें स्फुरत असतें. एकाग्र मनानें त्या आपल्या आत्म्याचा शोध करीत किंवा बुडी मारीत तूं हृदयांत प्रवेश कर—[श्रीरमणगीता अ. २ श्लो. २] तुमच्या हृदयांतला व माझ्या हृदयांतला आत्मा एकच. मग तुम्ही कोठेंही गेलांत, कांहींही केलेंत वा बोललांत तर तें मला कळतें यांत कसलें आश्चर्य आहे? एकाच खोलींत जवळजवळ बसणाऱ्या माणसाना एकमेकांचें बोलणें वा कृति कळली तर तो काय चमत्कार म्हणावयाचा? निसर्ग नियमास धरूनच ती गोष्ट आहे. यांत वैशिष्ट्य हेंच कीं बाबांनीं सर्व प्राणीमात्राशीं एकात्मता साध्य करून घेतली होती व तशी एकात्मता कधीं काळीं आपणही साध्य करून घेऊं या विश्वासानें बाबांनीं सांगित-लेल्या उपदेशाप्रमाणें आपण आपलें जीवन व्यतीत करण्याचा सतत प्रयत्न करीत राहणें हें आपणा साईभक्तांचें पवित्र कर्तव्य आहे. यास्तव बाबांच्या अशाप्रकारच्या लीला हें धरमसीला वाटलें त्याप्रमाणें केवळ चमत्कार आहेत असें समजून त्यांचें नुसतें कौतुक करीत न बसता बाबांनीं सांगितलेला तो हृदयस्थ त्याची उपासना करण्याकडे अधिक लक्ष दिलें पाहिजे. बाबांची सगुण भक्ति करतांना केवळ त्यांच्या बाह्यदेहाची पूजा न करतां जो सर्व हृदयस्थ त्याचीही पूजा केली पाहिजे. मी केवळ शिर्डीत द्वारकामाईत नसून सर्व हृदयस्थ आहे हें लक्षांत घेऊन केवळ माझ्या देहास ईश्वर न समजतां माझ्या हृदयस्थाची पूजा करा. तुमच्या व माझ्या अंतःकरणांत देवाण घेवाण होऊं द्या. यासाठीं तुमच्या व माझ्या हृदयांच्या मध्यें असलेली तेल्याची भिंत (अहंकार) पाडून टाका म्हणजे मला व तुम्हांला इकडून तिकडे मोकळेपणें जातां येतां येईल. बाबाचें हें सांगणें आपण नीट लक्षांत घेतलें

पाहिजे. भक्ति कोणत्याही देवताची करावी, अमुकच दैवताची भक्ति करा असें बाबांचें सांगणें नाहीं. अमुकच प्रकारें पूजा करा, वा व्रतें पाळा वा अमुकच नैवेद्य दाखवा असा त्यांचा आग्रह नाहीं. आपल्या भावनेशीं जमेल त्या दैवताची सगुण भक्ती आपल्या आवडीप्रमाणें खुशाल करावी. बाबांचें सांगणें एवढेंच कीं सगुणभक्तीच्या थाटामाटांत, तिच्या पसाऱ्यांत, रुढी व शास्त्रें यांच्या बंधनांत पडून तेथेंच स्थिर होऊं नका तर हें सर्व करतांना हा सर्व मायावी पसारा असून जें सत्य तें आंत आहे हें ध्यानांत घेऊन आंत शिरण्याचा प्रयत्न करा. ( Get in, get in.—श्री रमण महर्षी ) या योगें केवळ सगुण भक्तीमुळें निर्माण होणारे दोष वा मध्यस्थामुळें भक्तीला येणारे बाजारी स्वरूप नाहींसें होऊन अध्यात्मिक प्रगती न खुंटता वाढीस लागेल. हृदयाची भक्ति कशी करावी याचा स्पष्ट मार्ग बाबानी दाखवून दिला आहे. गैरसमज व भेदाभेद होऊं नयेत म्हणून बाबांनी कांहीं गोष्टी स्पष्ट केल्या आहेत. माझी सगुण पूजा वा भक्ति आपल्या भावनेप्रमाणें, आवडी-प्रमाणें काय करावयाची असल ती करा. माझ्या पूजेसाठीं तुमच्या घराण्यात चालत आलेले कुलाचार वा पाळण्यांत येत असलेली शास्त्रें सोडण्याची कांहीं एक जरूरी नाहीं. पण एवढें ध्यानात घ्या कीं, सगुण भक्ति करीत असतां निर्गुणांत डोकावण्याचा प्रयत्न करा. असें कराल तर माझी तुमच्यावर पूर्ण कृपा राहील.

## भक्तीचा गोडवा पाहिजे.

या सर्व गोष्टी साधतां याव्यात म्हणून कोणत्या दृष्टीनें भक्तानें आपल्याकडे पहावें व अशी दृष्टी येण्यास काय करावें हें बाबांनीं सांगून ठेवलें आहे. माझी मंत्रतंत्रयुक्त शास्त्रोक्त पूजा आवड म्हणून जरी केलीत तरी माझें लक्ष तिकडे नसते. मुंग्या वा डोंगळे साखर वा गुळाच्या जसे शोधांत असतात तसा मी तुमच्या हृदयाच्या शोधांत असतो. ज्या ठिकाणीं भक्तीचा गोडवा मला आढळतो त्या ठिकाणीं मी ओढला जातो. तेथें डोंगळ्यासारखा चिकटून राहतो. मग भक्तानें मला सोडले तरी मी भक्ताला सोडत नाहीं. नव्हे आम्ही दोघे एकमेकांस सोडूंच शकत नाहीं. भक्तीचा गुलाब, शुद्ध प्रेमाचा हिरवागार चाफा, भावना वासनांच्या पांढऱ्या शुभ्र जाईजुई, दयेची सायली इत्यादी फुलांनीं माझी पुजा करा. त्यांचे हार मला घाला. मी नेहमीच सांगतो—नलगे मज पूजासंभार। षोडशवा अष्टोपचार। जेथें भाव अपरंपार। मजला थार तें ठायीं॥ माझी पूजा म्हणजे कोणाची? या देहाची नव्हे. देह हें ज्याचें तात्पुरते साधन आहे असा जो तो मी, त्या मीची. सर्व चराचर व्यापणारा असा जो तो मी. त्या मीची, चैतन्याची, अव्यक्ताची सच्चिदानंदाची, तुम्हां सर्वांच्या हृदयस्थाची. नमस्कार कोणाला कराल? या देहाला नव्हे. तर—ऐसा तुम्हां हृदयस्थ जो मी। तयासी नमा नित्य तुम्ही। भूतमात्राच्याही अंतर्यामी।

तोच तो मी वर्ततों ॥ निष्काम कर्मयोगाचें गंध लावा. दयेच्या उदकानें नैवेद्य दाखवा. ही दया तरी कोणती ? नैवेद्य कसा दाखवाल ?—अशीच माझी दया जाणावी । भुकेल्या भाकर आधीं द्यावी । आपुल्या पोटा नंतर खावीं । धरावे जीवीं हें नीट ॥ क्षुधेनें व्याकूळ जयाचे प्राण । तयास देती जे अन्नावदान । माझीया मुखींच ते सूदिले जाण । सर्वत्र प्रमाण मानी हे ॥ निष्ठा आणि सबुरी हे दोन पैसे मला दक्षिणा म्हणून द्या. जास्त कांहीं तुमच्याकडून नको. अहंकाररुपी उदाचा धूप लावा. अशी ही माझी निर्गुणयुक्त सगुण पूजा गुरुवारीं व शुक्रवारी करा. म्हणजे केव्हां करा कशी करा ?— गुरुवार आणि शुक्रवारी । सूर्यास्ति सारवूनियावरी । उद जाळील जो क्षणभरी । देईल श्रीहरी सुख तयाला ॥ गुरु म्हणजे भक्ति. शुक्र म्हणजे तेजवीर्य पराक्रम या गोष्टी दमनानें साध्य होतात. माझी भक्ति गुरुवारीं व शुक्रवारी करा म्हणजे दमनपूर्वक वासनाविरहीत होऊन भक्तिपूर्वक माझी पूजा करा. अशाप्रकारें माझी निर्गुणयुक्त सगुणपूजा रोज करीत राहिल्यास काय होईल ? सोनं होईल, कल्याण होईल. अक्षय्य सुखाचा व आनंदाचा लाभ होईल. अशी तुमची माझ्यावरची निष्ठा व भक्ति पाहून मी आनंदानें नाचेन. तुमचा सर्व भार मी माझ्या शिरावर घेईन. तुमचा सर्व संसार मी चालवीन. तुमच्या घरीं अन्नवस्त्रास तोटा पडणार नाहीं. एवढेंच नव्हे तर वेळ आलीच तर—कृतांताच्या दाढेमधुनी । काढी मी निजभक्ता ओढुनी ।




# लहान मुलांच्या आंकडीवर

## जुनें आणि प्रसिद्ध औषध

**जयकर्स चिल्ड्रन्स कन्व्हलशन् रेमेडी**

सोल प्रो. जयकर ब्रदर्स, ६६. मरीन ड्राईव्ह, मुंबई १.

: स्टॉकिस्ट :

कांचनलाल वाडीलाल कं. — दवाबझार, मुंबई २.

# जैन तत्त्वज्ञान

लेखक : केशव कृष्ण प्रधान

**जैन समाजांतील लोकांबरोबर आपण वावरतों, व्यवहार करतों. ते आमच्यापैकींच आहेत; परंतु ईश्वरासंबंधीं त्यांचें तत्त्वज्ञान कांहींसें वेगळ्या स्वरूपाचें आहे; त्याचें स्वरूप काय आहे हें आपण समजून घेतलें पाहिजे. ती समजून देण्याची कामगिरी प्रस्तुत लेखांत श्री. केशव कृष्ण प्रधान यांनीं समर्थपणें व सुलभपणें पार पाडिली आहे.**

**—संपादक**

## मूळ सिद्धांताचा खोल अभ्यास

जैनांचें तत्त्वज्ञान हें एक अजब तत्त्वज्ञान आहे. जैन तत्त्वज्ञानाचे ग्रंथ थोर, बुद्धिमान् स्वार्थत्यागी पुरुषांनीं लिहिले असून त्यांनीं आपल्या अध्यात्मज्ञानांत फारच मोलाची भर घातली आहे. जितका जितका जैन अध्यात्म तत्त्वज्ञानाचा अभ्यास करावा तितके तितके या तत्त्वज्ञानाविषयींचें आपलें कौतुक वाढत जाते व पृथ्वीच्या उत्पत्ति, स्थिति व लय या अवस्था, पाप–पुण्याबद्दलच्या आपल्या कल्पना, तीव्र वैराग्याचें महत्त्व, मानवांतील मी व मोक्ष यांचा परस्पर संबंध या सर्व तत्त्वज्ञानापयोगी मूळ सिद्धान्ताचा या थोर पुरुषांनीं किती सखोल अभ्यास केला आहे याबद्दल आश्चर्य वाटतें.

## जैन तत्त्वज्ञानाचा गाभा

जैन तत्त्वज्ञानाचा मूळ सिद्धान्त द्वैतवादी असून परमाणु सृष्टी आणि जीव सृष्टी या दोन सृष्ट्या एकमेकांपासून सर्व तऱ्हेनें भिन्न, इतकेंच नव्हे तर कधींहि संयोग न पावणाऱ्या अशा आहेत. हें त्यांचें ठाम मत आहे. परमाणु परमाणूंच्या स्वभावाने चालतात तर जीव हा आपल्या स्वाभाविक तऱ्हेनें चालून अस्वाभाविक तऱ्हेनेंहि चालतो असें ते मानतात. जीवानें आपली स्वाभाविक स्थिती विसरून अस्वाभाविकरित्या परमाणूंना आपल्या भोंवती लपेटून घेतले म्हणूनच त्याला निरनिराळ्या योनींत जन्म येतो असे त्यांचें म्हणणें आहे. अशा तऱ्हेनें जीवानें अस्वाभाविकरित्या परमाणूंशी संयोग करण्याची इच्छा केल्याकारणानें तो परमाणूंच्या

लपेटण्यामुळें कमी अधिक मलीन झाला आहे व त्यामुळें त्याची स्वाभाविक मुक्त स्थिती नाहींशी झाली आहे, असें जैन लौकांचें तत्वज्ञान आहे.

### एकंदर चार योनी

जैन तत्त्वज्ञानाप्रमाणें एकंदर योनी चार. त्या म्हणजे (१) नारकी (२) तीर्यंचा (३) मानव (४) देव. जीवांच्या अस्वाभाविक परमाणुसंगाच्या कमी अधिक प्रमाणामुळें त्याला या योन्या प्राप्त होतात. परमाणूंनीं पूर्ण मलीन झालेला जीव नारकी योनींत [ म्हणजे आपण ज्यास नर्क म्हणतो ] जन्म होतो. म्हणजे दगड, धोंडा, माती अशा स्थितींत जन्माला जातो. त्यापेक्षां कमी मलीन असलेला जीव तीर्यंचा योनींत जातो. म्हणजे झाडें, फुलें, फळें, पशु, पक्षी या योनींत जल्म होतो. त्याहूनही कमी मलीन जीव मानवी योनींत जन्माला येतो व अतिशय कमी प्रमाणांत मलीन झालेला जीव देव योनींत जातो. फक्त मुळींच, मलीन न झालेला परमाणूशी अस्वाभाविक संग करण्याची इच्छा पूर्णपणें सोडून मोक्षपदाप्रत पोहोंचतो.

### पापपुण्य भावनांचा उदय

परमाणूशी संग करण्यामध्यें परमाणूंच्या सहाय्यानें आपली आधिभौतिक इच्छा पूरी व्हावी–होईल असें वाटल्यामुळें जीव हा सर्व अस्वाभाविक खटाटोप करतो. जीवांची परमाणु संलग्नता हेंच आपण ज्यास कर्म म्हणतो ते आहे. याच कर्मांतून पाप–पुण्याच्या भावनांचा उदय झालेला आहे. चांगली इच्छा किंवा वाईट इच्छा ही दोन्ही कर्मेंच आहेत. कारण परमाणूंचा चांगला उपयोग किंवा वाईट उपयोग परमाणूंचे सहाय्य घेतल्याशिवाय जीवाला करता येत नाहीं. जीवानें परमाणूंचा उपयोग चांगल्या तऱ्हेनें केला तर तो पुण्याचा संचय करतो व वाईट तऱ्हेनें केला तर तो ओघानेंच पापाचा संचय करतो. मूळांत जीवाची परमाणु संलग्नता मोक्षाची वाट अडविते. त्यामुळें पुण्य अथवा पाप हें दोन्हीही जीवाला बंधनकारक आहेत. पुण्याचा उदय झाल्यास जीवाला सर्व आधिभौतिक सुखे मिळतात. परंतु पापांचा उदय झाल्यास जीवाला सर्व आधिभौतिक दुःखें सहन करावी लागतात. म्हणून पुण्य चांगलें व पाप वाईट असेंच कांहीं जैन लोक समजत नाहींत. उलट तर, पुण्याचा संचय होऊन आधिभौतिक सुखें मिळाल्यावरच मानवाची प्रवृत्ति पापाकडे वळते असें त्यांचें म्हणणें आहे. कारण कीं या स्थितींत पाप करण्याची सर्व साधनें त्यास सहज प्राप्त झालेलीं असतात. पापापेक्षां पुण्य महाभयंकर आहे व आधिभौतिक दुःखें भोगीत असतांना मनुष्य चांगल्या तऱ्हेनें वागून पुण्य संचय करण्याचा प्रयत्न अधिक करण्याचा संभव आहे. परंतु पुण्याचा उदय झाला असतां त्याला पाप मार्गाकडे जाण्याचा मोह टाळतां येणें दुष्कर आहे असें त्यांचें मत

आहे. महाभारतांत त्यासंबंधी पांडवमाता कुंतीचा दाखला दिला आहे. तो जैन तत्त्वज्ञानाला अगदीं संमत आहे. कुंतीनें देवाजवळ अशी प्रार्थना केली कीं हे परमेश्वरा ! मला नेहमी दुःखातच ठेव म्हणजे तुझा विसर पडणार नाहीं. त्याप्रमाणेंच जैन मत आहे. पाप आणि पुण्य व पुण्य आणि पाप हे चक्र जीवाच्या परमाणु संलग्नतेतच चालते. जीवाची परमाणु संलग्नता सुटली की तो पाप–पुण्य, सुखदुःख, राग, द्वेष या मानसीक द्वंद्वांतून मुक्त होतो. परमाणु परमाणूच रहातात. जीव परब्रह्मांत विलीन होऊन मोक्ष स्थिती प्राप्त करून घेतो. असें त्यांचें तत्त्वज्ञान आहे.

### पापाचे पांच विभाग

जैन तत्त्वज्ञानांत कर्म आणि पाप याचा फारच सूक्ष्य तऱ्हेनें विचार केला आहे. तो इतक्या बारकाईनें केला आहे कीं, एकंदर कर्म किती तऱ्हेचें आहे किंवा पाप किती तऱ्हेचें आहे यांची गणती करतांना मानवी बुद्धी थकून जाते. नुसत्या पापाचा विचार केला तर त्याचे त्यांनीं ठोकळ विभाग पांच केलें आहेत. ह्या पापाचे दुसरें पुष्कळ विभाग आहेत. त्या सर्वांचा आपल्याला येथें विचार करावयाचा नाहीं. पांच ठोकळ विभाग असे—

(१) हिंसा (२) झूट (३) चोरी (४) अब्रह्मचर्य (५) परीग्रह- हाताच्या पांच बोटांपैकीं अंगठा हें पांचवे व शेवटचें बोट जसे फार महत्त्वाचे आहे त्याप्रमाणें वरील पांच ठोकळ पापांपैकी ‘परीग्रह’ हें पाप सर्वांत महाभयंकर पाप असे ते मानतात. परीग्रह म्हणजे प्रत्येक वस्तू लुबाडण्याची किंवा मिळविण्याची व संग्रह करून ठेवण्याची इच्छा म्हणजे थोडक्यांत मानवांतील लोभवृत्ती. मानवाचा जर लोभ सुटला तर तो हिंसा करणार नाहीं, खोटे बोलणार नाहीं, चोरी करणार नाहीं व सूख घेण्याच्या इच्छेनें वीर्यनाशही करणार नाहीं. म्हणून जैन तत्त्वज्ञानांमध्यें वैराग्याला अतिशय महत्त्व प्राप्त झालें आहे. परीग्रह सुटून अपरिग्रह निर्माण होण्यासाठीं वीत राग अशी स्थिती प्राप्त व्हावी लागते. ज्याचा लोभ आणि मोह सुटला तो मनुष्य निर्भय होतो. म्हणून वीत-रागभय अशी स्थिती त्याला प्राप्त होते. जैन तत्वज्ञानांत संन्यास धर्माला यामुळें फारच महत्त्व आलें आहे. सद्वस्तूंचा पुरा शोध घेण्यासाठीं सर्व गोष्टींचा न्यास म्हणजे सर्व संग परीत्याग करणे ह्याला जैन लोक सर्वांत श्रेष्ठ असा पुरुषार्थ मानतात.

### मायेंतून मुक्तता

मी जीव आहें, मी ब्रह्म आहें, मी परब्रह्म आहें. माझा परमाणूशी कांहींएक संबंध नाहीं. मी केवळ चैतन्य असून माझा स्वभावधर्म व परमाणूंचा स्वभावधर्म अगदीं वेगळा आहे. परमाणु नित्य नवे जग निर्माण करीत रहाणार व चैतन्य नित्य अमर स्थितीत रहाणार. दोघांचे मार्ग भिन्न व परस्परविरोधी आहे. परमाणूंची सृष्टी


परमाणूंच्या गुणधर्माप्रमाणें निर्माण झाली. परमाणु एकमेकांशीं किंवा एकमेकांपासून संलग्न किंवा किंवा विलग्न तरी सतत होत असले तरी त्यांचें मूळ स्वरूप अविनाशी आहे. परंतु त्या अवीनाशीत्त्वाचा व चैतन्याच्या अविनाशीत्त्वाचा कांहींएक संबंध नाहीं. प्रकृति प्रकृतिच रहाणार पुरुष पुरुषच रहाणार. आपण सर्व पुरुषच रहाणार. आपण सर्व आहोंत प्रकृति नाहीं. प्रकृतिशीं संलग्न होण्याच्या क्रियेमुळें आपण स्वयंसू पुरुष असून आपण निष्कारण कर्याच्या धाग्यादोऱ्यांनीं जखडून गेलों आहोंत. प्रकृति हचि माया. ह्या मायेंतून जितके आपण लवकर सुटूं तितके आपण मोक्षपद लवकर मिळवूं.

## जैन मुनींचा मार्ग

जैन तत्वज्ञानाप्रमाणें कर्माचे दोन ठोकळ विभाग होतात. (१) घाती कर्म (२) अघाती कर्म. घाती कर्म म्हणजे जें कर्म आपण आपल्या पुरुषार्थानें बदलू शकतो तें व अघाती कर्म म्हणजे जें कर्म कितीही पुरुषार्थ केला तरी बदलू शकत नाहीं तें. घाती कर्माचें फल टाळतां येतें. अघाती कर्माचें फल कांहीं केलें तरी टाळतां येत नाहीं. जन्म, मृत्यु आणि रोग यांचा समावेश अघाती कर्मात होतो व त्यांचे भोग हे विधात्याला देखील सुटत नाहींत म्हणून जैन साधू कुठल्याही पातळीवर गेला तरी तो जन्म, मृत्यु आणि रोग या तीन अवस्थेबद्दल कधींही कुरकुर करीत नाहीं हा नशिबाचा न टाळतां येणारा भाग तो निमूटपणें सहन करतो. जन्म कुठल्याही परिस्थितींत कुठल्याही कुला–शीलांत दारिद्र्यांत किंवा श्रीमंतीत, सुदृढ किंवा अपंग स्थितींत, कसाही झाला तरी जैन मुनि त्याविषयीं कधींही खेद मानित नाहींत. त्याचप्रमाणें कोणत्याही दुर्धर व्याधीनें कितीहीं वर्षें त्याला पछाडलें तरी तो भोग तो निमूटपणें सहन करतो व कुठेंही कोणत्याहि परिस्थितीनें अगर रितीनें मृत्यु आला तरी तो डगमगून जात नाही, कारण वरील तीन ही गोष्टी ह्या अघाती कर्माचे भाग असून ते कांहींही केलें तरी टळणारे नाहींत. हा जैन तत्त्वज्ञानाचा पूर्ण सिद्धान्त आहे. तेव्हां अघाती कर्माचा भाग निमूटपणें सहन करून घाती कर्माचा पुरुषार्थानें नाश करूनच जैन मुनि मोक्षाचा मार्ग आक्रमिन्त असतो.


जैन तत्त्वज्ञानाचे सिद्धान्त अद्वैत विशिष्ट अद्वैत वगैरे वेदान्तीक सिद्धान्ताहून वेगळे असले तरी देखील त्या सिद्धान्तात पारमार्थिक मार्ग उत्तम तऱ्हेनें अनुकरण्यास फार मोठें उत्तेजन दिलें आहे व त्यामुळें जैन मुनींमध्यें कांहीं मुनी फारच श्रेष्ठ पदाला पोहोंचले आहेत. परमार्थ दृष्ट्या प्रगति होण्यास वैराग्याची विशेष जरूर असते. व म्हणूनच जग हे मिथ्या आहे, जग ही माया आहे वगैरे सिद्धान्त सुद्धा द्वैत, अद्वैत व विशिष्ट अद्वैत या सर्व मार्गांत प्रतिपादलेले दिसतात. तत्त्वतः जग हें भ्रममूलक नसून त्याचे

अस्तित्व हें पूर्ण सच्चिदानंदाचेंच अस्तित्त्व आहे असें श्री. अरविंदांनी आपल्या Life Divine या पुस्तकांत सिद्ध केले आहे. त्यांची विचारसरणी इतकी शास्त्रशुद्ध आहे अनुभवजन्य आहे कीं तिचें पूर्णपणें आकलन झाल्यास ज्याला आपण माया म्हणतो तो माया वाद हाच मुळांत मानवाचा भ्रम आहे हें दिसून येईल. अर्थात् याविषयीं आपण स्वतंत्र लेखांत विचार करूं. तरी देखील मानवाला अंतरिक सत्याची ओढ लागण्यासाठी बाहेरील सर्व आधिभौतिक सृष्टीचा निरास करून त्यातील वस्तुमात्रा-विषयीची आवड सहृदस्थ आत्मारामाकडे लावण्यास मायावादाचा निःसंशय फायदा होतो असे आढळून आल्यामुळेच या सर्व सिद्धान्तांना महत्त्व आहे. या दृष्टीने पहातां द्वैतवादी असलेले जैन तत्त्वज्ञानसुद्धां मानवाच्या अंतीम शोधाला व सुखाला निःसंशय पोषकच आहे. व म्हणूनच जैन तत्त्वज्ञानाला जगातील निरनिराळ्या तत्त्वज्ञानांत श्रेष्ठपद प्राप्त झालेले आहे.



दिव्य दृष्टीसाठीं TELIGRAM :—DIVYANETRA

**शिसा ऑप्टिशिअन्स** (BOM. DADAR)



[ चष्म्यांचे व्यापारी ]

यांच्या येथें तज्ञ डॉक्टरांकडून डोळे मोफत तपासून उंची व टिकाऊ चष्मे माफक दरानें मिळतील

छबिलदास रोड, दादर (W. R.).

# बाबांचा कर्मयोग

लेखक :— बा. भा. मगदूम

बाबांचा कर्मयोग सेवामय, कष्टप्रद व विशाल स्वरूपाचा होता. खणा, गाड्या भरा व हा खजिना लुटून न्या असें ते सांगत. कष्ट, सेवा व श्रद्धा ही बाबांच्या कर्मयोगाची योगसाधनें होती. हा कर्मयोग सचेपणा व भलेपणानें भरला होता. लांडी-लबाडी व कुटीलपणाचा वाराही बाबांना खपत नसे. अशा खोटेपणाचा संपर्क ते लावून घेत नसत. त्याचा परस्पर नाश होईल याची ते दक्षता घेत. चांगल्या गोष्टींचे श्रद्धेनें स्वागत करणारा व वाईटाचा कठोरपणे प्रतिकार करायला शिकवणारा कर्मयोग बाबांनी सांगितला व स्वतःहि आचरणांत आणला. पुष्पाहून कोमल व वज्राहून कठोर असें बाबांचे व्यक्तिमत्त्व होते. फाजील भोळसटपणा व आडदांडपणाचाही त्यांना तिटकारा होता. 'रेड्यासंगे घाट चढणारे,' मानभावी भक्त बाबांना नको होते तर सचेपणाचा खडतर मार्ग आचरणारे खरे निष्ठावंत भक्त त्यांना हवे होते. खोटेपणाची बाजारी बोरें बाबा धुळींत भिरकावून देत व भीक मागून आणलेली चटणीभाकर खाऊन संतोष पावत.

जरी खोटेपणाचा बाबांना तिटकारा असला तरी ते कोणाचाही द्वेष करीत नसत. भल्याबुऱ्याकडे समदृष्टीनें पहाणारी संतांची दृष्टी त्यांच्याकडे होती. वृक्षवल्ली आम्हा सोयरीं वनचरें, अशी सर्वांना सामावून घेण्याची शक्ति त्यांच्याठायी होती. कुष्ठरोग्यांची, पशुरक्षांची व दीनदुबळ्यांची बाबा सेवा करीत. एकाचा महारोगही त्यांनी आपल्या सामर्थ्यानें नाहींसा केला. व्यक्ति जीवनांतील अगर सामाजिक जीवनां-तील हीनत्व नाहींसे झाल्याखेरीज श्रेष्ठत्वाची प्राप्ति होत नाहीं, हें दाखवुन दिलें. हीन कर्मबंधनें तोडून श्रेष्ठ कर्मबंधनें आचरावी व हें करीत असतांना प्रत्यक्ष मृत्यूचेंही भय वाटूं नये असा निर्भयपणा बाबांच्या कर्मयोगांत दिसून येतो. अपेक्षा, उपेक्षांची आंधळी कोशिंबीर खेळण्यापेक्षां संकटाला सामोरे जाऊन सत्याशीं समरस होण्याची आवश्यकता हा कर्मयोग शिकवतो. फुकटे बाजीराव व आळशी घमेंडखोर न बनता घाम गाळून स्वानंदसुखाचा आस्वाद घेणें हें अधिक श्रेयस्कर होय. यासाठींच बाबा स्वतः जवळचे धन वाटून टाकीत व भिक्षा मागून देहधारणा करीत 'ओम् भवति भिक्षां देही' या वचनाचा हाच अर्थ आहे कीं, परमेश्वरानें हा मानवी देह आपणास भिक्षेच्याच स्वरूपांत दिला आहे.

**Beg pardon with nature. Beg pardon with commands.**

Beg pardon with divinity हा बाबांच्या भिक्षांदेहीचा अन्वयार्थ होता. कावळा राऊळाच्या सोनेरी कळसावर बसला तरी त्याला राजहंसाची बरोबरी करता येणार नाहीं. कान्होपात्रेसारखी गणिकाही विठ्ठलस्वरूपांत लीन झाली; कारण तिची भक्ति राजहंसाची होती. सदाचरणानें वाल्याकोळ्याचा वाल्मिकी होऊं शकतो. चंद्र हा परप्रकाशी असला तरी विश्वाला आपल्या शीतल किरणांचा लाभ करून देतो म्हणून तो जगाला प्रिय आहे. तसेंच मानवाचेंही आहे. मानव ज्यावेळीं स्वतःच्या दुर्गुणांचा नाश करून सद्गुणांचा प्रकाश जगाला देऊं शकेल त्यावेळीं—त्याचें जीवन सफल होईल. सेवामार्गाचें स्वरूपही असेंच आहे.

खोटी पुजा मग ती कितीही मोठ्या खर्चाची असो. परमेश्वराला मंजूर होत नाहीं. Resting night can not be a passing night सत्यावर बेगडी असत्याचा लेप बसू शकत नाहीं. बसला तरी टिकूं शकत नाहीं हें निर्विवाद आहे. म्हणून उच्च प्राप्तीसाठीं साधनें व साधक दोन्ही शुद्ध स्वरूपाचे असावे लागतात. 'योजकस्तत्र दुर्लभः ही बाबांच्या कर्मयोगाची कसोटी आहे.' 'प्रसंग नीतिपेक्षा,' प्रमाण नीति श्रेष्ठ आहे. सामान्य माणसें प्रसंगानुसार आपलें धोरण ठरवतात. म्हणून त्याना हमखास यशाची खात्री नसते. जे सत्याला साक्षी ठेवून आपलें धोरण ठरवतात, त्यांना प्रसंगी माघार घ्यावी लागली तरी अंतिम यश त्यांचेच असतें. असा आजवरच्या इतिहासाचा दाखला आहे. शिवाजीसारख्या रणवीर मुत्सद्यांना 'साईबाबासारख्या, मानवधर्म संस्थापकांनाहि अनेकवेळां माघार घ्यावी लागली. संकटांशीं सामना द्यावा लागला पण मूलतः त्यांचें ध्येय उच्च प्रतीचें असल्यानें त्यांना यशप्राप्ती झाली. आपल्या पराक्रमानें या नश्वर विश्वांत ते अजरामर झाले. 'मरावें परी कीर्तिरुपें उरावें।' हा समर्थांचा दिव्य संदेश 'साईबाबानी' आपल्या कर्मयोगानें भारतीय जनतेस दिला.

॥ श्रीसाईनाथ प्रसन्न ॥

# महिला वस्तु भांडर

**भरतकाम, विणकाम, शिवणकाम**

यांस लागणारें सर्व साहित्य व भरतकामाचीं पुस्तकें लोंकर, गंगावनें आणि सौंदर्यप्रसाधानांचे व्यापारी.

**छबीलदास रोड, दादर, मुंबई २८. (वेस्टर्न रेल्वे)**

**※ आमची कोठेंही शाखा नाहीं. ※**

# श्रीज्ञानेश्वरापूर्वीचा काळ
# मुकुंदराजांचें परमामृत

—गुरुदेव रानडे.

## १. ज्ञानेश्वरकालीन महाराष्ट्र.

ज्ञानेश्वरांच्या काळचा महाराष्ट्र स्वतंत्र होता. तेथील लोकांना मुसलमान लुटारूंचा व गुंडांचा त्रास झाला नव्हता. देवगिरीचे सर्व राजे—विशेषतः राजा जैत्रपाळ फारच बलाढ्य होता. त्यानें इ. स. ११९१ ते १२१० पर्यंत म्हणजे शके १११३ ते ११३२ पर्यंत—राज्य केलें. देवगिरीच्या पहिल्या राजाचा मोक्षगुरु श्रीमुकुंदराज होते, असें दिसतें. श्रीमुकुंदराजांनीं "परमामृत" व "विवेकसिंधु" हे सुप्रसिद्ध ग्रंथ लिहिले. हे मराठी वाङ्मयाचे पहिलेच मोठे लेखक असावेत असें वाटतें. श्रीज्ञानेश्वरकालीं यादवराजा—रामदेवराव—देवगिरीस राज्य करीत होता. ज्ञानेश्वरीच्या शेवटीं राजा रामदेवरावांचा उल्लेख केलेला आहे. हा राजा विद्येचा मोठा पुरस्कर्ता व पंढरीच्या विठोबाचा परम भक्त होता, असें दिसतें. कारण त्यानें पंढरपूरच्या देवळास भेट दिली तेव्हां त्या देवळास फार मोठी देणगी दिली. एकंदरींत पाहतां श्रीज्ञानेश्वरांच्या पूर्वी महाराष्ट्रांत स्वातंत्र्य, सुबत्ता व शांति पूर्णपणें नांदत होती. यादवी, युद्ध वा भांडणाचें नांवहि ऐकूं येत नव्हतें. सर्वत्र ऐक्याचें साम्राज्य होतें.

## २. श्रीमुकुंदराज

श्रीमुकुंदराज हे राजा जैत्रपाळाचे गुरु होते. श्रीमुकुंदराजांविषयीं चार शब्द लिहिणें जरूर आहे. कारण त्यांच्या 'परमामृत' या ग्रंथाच्या नांवामुळें पुढें श्रीज्ञानेश्वरांना आपल्या ग्रंथास "अनुभवामृत" किंवा "अमृतानुभव" हा मथळा द्यावा अशी कल्पना सुचली असावी. श्रीमुकुंदराजांच्या लिखाणावरून ते नुसते वेदान्ती नसून श्रेष्ठ आत्मज्ञानीहि होते हें उघड आहे. हरिनाथ हे आपले प्रत्यक्ष मोक्षगुरु असून आपली गुरुपरंपरा आदिनाथापासून सुरू होते असे श्री. मुकुंदराजांनीं आपल्या "विवेकसिंधु" ग्रंथांत म्हटलें आहे. ईश्वरावर पूर्ण निष्ठा, उपवास, समाधि इत्यादि ईश्वरप्राप्तीच्या अनेक साधनांच्या साहाय्यानें श्रीहरिनाथांनीं शंकराची कृपा

संपादण्याची शिकस्त केली. शेवटीं, एके दिवशीं त्यांना दृष्टांत झाला, एकदम शंकर त्यांच्यापुढे उभा राहिला व त्यांना पूर्ण आत्मज्ञान प्राप्त झालें, असें श्रीमुकुंद-राजांनीं विवेकसिंधूंत सांगितलें आहे. श्रीमुकुंदराजांच्या ग्रंथांची भाषा आधुनिक दिसते म्हणून तें इतकें प्राचीन ग्रंथकार नसावेत असें वाटतें. परंतु, अनेक प्राचीन ग्रंथ अर्वाचीन भाषेंत पुनः मुद्रित व प्रकाशित झाले आहेत ही गोष्टहि लक्षांत ठेवण्या-सारखी आहे. याप्रमाणें श्रीमुकुंदराजांचे ग्रंथहि अर्वाचीन भाषेंत प्रसिद्ध झालें असावेत. म्हणून त्यांच्या ग्रंथांत जो आधुनिकपणा दिसतो तो त्यांना त्यांच्या पश्चात् आधुनिक भाषेंत त्यांचें ग्रंथ प्रसिद्ध झाल्यामुळें असावा असें म्हणण्यास हरकत नाहीं. “ विवेकसिंधु ” हा ग्रंथ श्रीमुकुंद- राजांनीं इ. स. ११८८ मध्यें लिहिला असा उल्लेख या ग्रंथांतच सांपडतो. या ग्रंथांत राजा जैत्रपाळ याचाहि उल्लेख आहे. राजा जैत्रपाळ इ. स. ११९१ ते १२१० पर्यंत राज्य करीत होता हें आतां इतिहासज्ञांनीं सिद्ध केलें आहे. श्रीमुकुंदराज अतिप्राचीन काळीं प्रसिद्धीस आले अशी त्यांच्याबद्दल जी आख्यायिका आहे, ती असंभाव्य वाटते.

### ३. श्रीमुकुंदराजांचें परमामृत

अद्वैत तत्त्वज्ञान मराठींत सुसंघटितपणें प्रतिपादण्याचा प्रथम प्रयत्न श्रीमुकुंद-राजांनीं आपल्या परमामृतांत केला आहे. स्थूल, सूक्ष्म व कारणदेहाचें स्वरूप इत्यादि अनेक वेदान्तपर विषयांचा उहापोह या ग्रंथांत केला आहे. या तात्त्विक वेदान्त चर्चेबरोबरच आध्यात्मिक अनुभवासंबंधींहि कांहीं सूचना श्रीमुकुंदराजांनीं या पुस्तकांत केल्या आहेत. यावरून श्रीमुकुंदराज नुसते वेदान्ती नव्हते, तर आत्मज्ञानी संतहि होते हें सिद्ध होतें. परमामृताच्या नवव्या प्रकरणांत योगाभ्यासानें परमेश्वराची प्राप्ति कशी करून घ्यावी हें श्रीमुकुंदराजांनीं सांगितलें आहे. बाराव्या प्रकरणांत आत्मानुभवापासून होणाऱ्या निरतिशय आनंदाचें वर्णन दिलें आहे. याच प्रकरणांत स्वानुभवाचा आनंद होऊं लागला म्हणजे त्या स्थितींत घाम व कंप सुटणें, इत्यादि अष्ट सात्त्विक भाव कसे उत्पन्न होतात याचेंहि वर्णन दिलें आहे. ईश्वर—चिंतनांत शरीराचा अभिमान गळून जातो; सर्व विषय—वासना नाहींशा होतात व कांहीहि कर्म न करतां इंद्रियांचीं इच्छा तृप्त होते तो श्रेष्ठ संत स्वानंद—राजभवनांत अनुभूति—सुंदरीस अलिंगन देऊन अत्यंत श्रेष्ठ सुखाचा अनुभव घेतो. या परमानंदाच्या धुंदींत साधकाच्या अंतःकरणांत दुसरी कोणतीच वृत्ति स्फुरत नाहीं. या स्वानंदसाम्राज्याचे सुख फक्त आत्मज्ञानीच अनुभवूं शकतो. इतर लोक त्याजकडे आश्चर्यानें टकमक पाहतच राहतात व स्वस्थ बसतात. तो आपला श्रेष्ठ अनुभव दुसऱ्या कोणासहि कळूं देत नाहीं. सर्व भूतमात्रें ईश्वराचें अंश असल्यामुळें आत्मज्ञ त्या सर्वांवर सारखें प्रेम करतो व त्या सर्वांच्या अंतःकरणां-

तलि भाव व विचार त्यास कळतात. तरी तो लोकांस वेड्यासारखा दिसतो. स्वानुभवाचा परमानंद उपभोगीत असतांना या संसारपाशांतून जगाचा उद्धार करावा, का त्याचा त्याग करावा याचें स्मरणच अशा योग्यास राहात नाहीं. आत्मज्ञानें आपलें गुपित (अनुभव) दुसऱ्या कोणासहि सांगू नये, असें श्रीमुकुंदराजांनीं स्पष्टपणें म्हटलें आहे. यावरून अनुभवानें प्राप्त झालेली त्यांची दूरदृष्टि किती तीव्र होती हें दिसून येतें. "आत्मज्ञान इतकें सवंग झालें, म्हणजे लोक त्याचा फायदा घेऊन चावट बनतील व आत्मज्ञानाची चेष्टा करतील" असें ते निक्षून सांगतात. या परमामृताचा खरा अर्थ समजून घेणारा संसारापासून परावृत्त होतो व त्यास खरें आत्मस्वरूपाचें ज्ञान लाभतें असें या पुस्तकाच्या शेवटीं श्रीमुकुंदराजांनीं सांगितलें आहे.

श्रीमुकुंदराज जैत्रपाळ राजाच्या कारकीर्दींत प्रसिद्धीस आले; तर श्रीज्ञानेश्वर देवगिरीचा राजा रामदेवराव याच्या कारकीर्दींत प्रसिद्धीस आले. राजा रामदेवराव पंढरीच्या विठोबाचे भक्त होते, हें पंढरपूरच्या देवळांतील एका शिलालेखावरून सिद्ध होतें. मार्गशीर्ष पौर्णिमा, शके ११९८ (इ. स. ११७६) या दिवशीं ते पंढरीस देवदर्शनास आले होते. पंढरपूरकरच्या वारकरी संप्रदायाच्या एका फडाचे ते पुढारी होते, हेंहि याच शिलालेखावरून सिद्ध होतें. राजे रामदेवरावाच्या कारकीर्दींतच श्रीज्ञानेश्वरांनीं शके १२१२ (इ. स. १९२०) सालीं आपली ज्ञानेश्वरी लिहून पुरी केली. श्रीज्ञानेश्वरांनीं समाधि घेण्यापूर्वी दोन वर्षे म्हणजे शके १२१८ (इ. स. १२९६ मध्यें अल्लाउद्दीन खिलजी देवगिरीवर स्वारी करण्याच्या उद्देशानें इलिचपूरला आला होता. त्याचें सैन्य असंख्य व बलाढ्य होतें त्यास दिल्लीच्या बादशहाची मदत होती. म्हणून रामदेवरावांनीं त्यास मोठ्या रकमेची खंडणी देऊन त्यास आपल्या राज्यांचें संरक्षण केलें. परंतु, शके १२२८ (इ. स. १३०६) मध्यें अल्लाउद्दीननें मलिक काफराच्या हाताखालीं मोठें सैन्य देऊन त्यास देवगिरीवर स्वारी करण्यास पाठविलें. तीस हजार घोडेस्वारांच्या मदतीनें मलिक काफरनें रामदेवरावांचें सर्व राज्य सहज पादाक्रांत केलें व रामदेवरावास कैद करून दिल्लीस नेलें. दिल्लीस रामदेवराव सहा महिने कैदेंत राहिले व पुढें देवगडास परत आल्यावर शके १२३१ [इ. स. १३०९] मध्यें मरण पावले. त्यानंतर देवगिरीचें राज्य फार दिवस टिकलें नाहीं; शके १२४० [इ.स. १३१८] मध्यें दिल्लीच्या बादशहानें तें खालसा करून आपल्या ताब्यांत घेतलें. रामदेवरावांच्या घराण्याची ही दुःस्थिति पाहण्यास श्रीज्ञानेश्वर जिवंत राहिले नाहींत. श्रीज्ञानेश्वर जिवंत असेपर्यंत रामदेवराजांच्या राज्याची सर्व प्रकारें भरभराट झाली.

**३. महानुभाव.**

श्रीज्ञानेश्वरकाळीं राजकीय परिस्थिति अशा प्रकारची होती. आतां तात्विक व

धार्मिक परिस्थिति कशी होती तें पाहूं. श्रीज्ञानेश्वराच्या काळापूर्वी महानुभाव संप्रदाय व नाथांची योगपरंपरा अशा दोन विचार–प्रणालिका महाराष्ट्रांत प्रचलित होत्या. महानुभव वाङ्मय निश्चितपणें विचाराई आहे. तेजस्वी भाषेच्या दृष्टीनें या महानुभवी वाङ्मयानें ज्ञानेश्वरीसारख्या बहुमोल ग्रंथनिर्माणाची पूर्वतयारी उत्तम प्रकारें केली होती, असें म्हणण्यास मुळींच हरकत नाहीं. या महानुभावी लोकांच्या कल्पना इंग्लंडांतील इलिझाबेथ राणीच्या कारकीर्दीतील प्राचीन लेखकांच्या कल्पनांप्रमाणें आहेत. म्हणून शेक्स्पिअरचा या प्राचीन लेखकांशीं जो संबंध, तोच श्रीज्ञानेश्वरांचा महानुभाव लेखकाशीं होता असें म्हणणें योग्य होईल. सर्व महानुभाव वाङ्मय अद्यापि प्रकाशित झालेलें नाहीं. कै. विश्वनाथ काशीनाथ राजवाडे यांनीं महानुभाव लिपीचा व वाङ्मयाचा अर्थ कसा लावावा हें प्रथम शोधून काढिलें. कै. भावे यांनीं मोठ्या परिश्रमानें कांहीं महानुभावी ग्रंथ प्रसिद्ध केले. आपलें वाङ्मय प्राचीन श्रेष्ठ मराठी ग्रंथकारांच्या तोडीचें आहे हें मराठी वाचकांना पटवून देण्याची महत्त्वाकांक्षा हल्लींच्या कांहीं महानुभावी लोकांच्या मनांत उत्पन्न झाली आहे. या सर्व गोष्टीमुळें महानुभावी वाङ्मयांतील प्रमुख ग्रंथ लवकरच सर्व मराठी वाचकांना वाचावयास मिळतील अशी आशा वाटते. ही आशा सफल झाली म्हणजे श्रीज्ञानेश्वरांचे उच्च विचार, उदात्त कल्पना व त्यांचा विलास, त्यांचें दिव्य काव्य व त्यांच्या प्रतिभेच्या भराऱ्या, त्यांची शब्दसंपत्ति व भाषासौष्ठव इत्यादिकांचा महानुभाव वाङ्मयाशीं काय संबंध आहे हें स्पष्टपणें सांगतां येईल. महानुभावांनीं धर्मामध्यें जी नवीन सुधारणा केली ती विशिष्ट व निराळ्या प्रकारची होती व या संप्रदायाशीं श्रीज्ञानेश्वरांचा मुळींच संबंध नव्हता ही गोष्ट मात्र ताबडतोब सांगतां येण्यासारखी आहे. महानुभवांनीं जे कांहीं योगाभ्यास लोकप्रिय केले, त्यांचा थोडा परिणाम ज्ञानेश्वरांवर झाला असेल. परंतु श्रीज्ञानेश्वर धर्माच्या मूलतत्त्वांच्या बाबतींत उपनिषदें, भागवत, भगवद्गीता इत्यादि प्राचीन ग्रंथांचा आधार घेतात व ही गोष्ट त्यांनीं ज्ञानेश्वरींत स्पष्टपणें सांगितली आहे. महानुभावांचा जातिभेदावर विश्वास नाहीं; त्यांना वेदांची शिकवण मान्य नाहीं; चतुर्विध आश्रमव्यवस्था त्यांना आवश्यक वाटली नाहीं व कृष्णाशिवाय दुसरा कोणताच देव त्यांना मान्य नाहीं, असे त्यांच्याविषयीं लोकमत होतें, परंतु, आतां त्यांच्यापैकीं कांहीं तज्ज्ञ व निःस्पृह लेखकांनीं स्पष्टपणें सांगितले आहे कीं, पुरातन कालापासूनच त्यांना जातिभेद संमत होता. यज्ञांत पशुहत्या करणें त्यांना मान्य नसलें, तरी एकंदरींत पाहतां त्यांचा वेदावर विश्वास होता, असें म्हणण्यास हरकत नाहीं. आश्रम व्यवस्थेस त्यांची संमति आहे. चक्रधर श्रीकृष्णाची ते पूजा करीत असले, तरी ‘ चक्रधर ’ म्हणजे अकराव्या शतकापूर्वी महनुभाव पंथ स्थापणारा ’ असा संकुचित अर्थ नाहीं.

म्हणून त्यांची 'कृष्णा'वर भक्ति असली तरी 'विठ्ठला'वर नाहीं. कृष्णाव्यतिरिक्त दुसरा कोणताच देव त्यांना संमत नाहीं. म्हणूनच ते कदाचित् काळे कपडे वापरत असावेत. महानुभावी वाङ्मयाचा श्रीज्ञानेश्वरांच्या मनावर परिणाम झाल्यामुळे श्रीज्ञानेश्वरांनीं आपल्या अभंगांत "काळ्या रंगाचा" उल्लेख केला आहे असें जें कांहीं टीकाकारांनीं सुचविलें आहे तें सर्वथैव निराधार आहे. आध्यात्मिक जीवनांत या काळ्या रंगाचें फार मोठें महत्त्व आहे. आध्यात्मिक श्रेष्ठ अनुभव असा या काळ्या रंगाचा अर्थ आहे. महानुभावी संप्रदायांतील काळ्या पोषाखाचा येथें उल्लेख नाहीं व तो अर्थ अभिप्रेत नाही, ही गोष्ट येथें स्पष्टपणे लक्षांत ठेवणें अत्यंत जरूर आहे. कृष्ण व विठ्ठल या दोन्ही देवांची पूजा श्रीज्ञानेश्वरी परंपरेला मान्य असल्यामुळें ही परंपरा व हा ग्रंथ महानुभावी संप्रदायाहून अगदीं निराळा आहे. त्या काळीं महानुभावी संप्रदायाचा प्रभाव सर्वांवर पडला होता ही गोष्ट नाकबूल करतां येणार नाहीं. तथापि, श्रीज्ञानेश्वरांनीं महानुभावाचा केवळ 'अनुयायी' किंवा केवळ 'टीकाकार' ही भूमिका न स्वीकारतां, हिंदुधर्माच्या मूळ व संप्रदायातीत ग्रंथांचा आधार घेऊन धर्म-तत्त्वविवेचनाच्या बाबतींत जास्त उदार, उदात्त, व शुद्ध पारमार्थिक दृष्टि ठेविली हें त्यांना अत्यंत भूषणावह आहे.

## ५. नाथ-संप्रदाय

श्रीज्ञानेश्वरकालापूर्वी महाराष्ट्रांत आणखी एक बलवत्तर विचार—परंपरा प्रचालित होती. ती म्हणजे नाथ—संप्रदायाची योगपरंपरा होय. श्रीज्ञानेश्वरांचे पणजोबा, श्रीत्र्यंबकपंत यांना आपेगांवीं गोरक्षनाथांकडून उपदेश म्हणजे अनुग्रह मिळाला होता. पुढें गोरक्षनाथाचा शिष्य गहिनीनाथ यांनीं श्रीनिवृत्तिनाथास अध्यात्म—दीक्षा दिली. हें आपल्या सर्वांस माहीत आहेच. गोरक्षनाथ हा मत्स्येंद्रनाथांच्या परंपरेंतला शिष्य होय. मत्स्येंद्रनाथ ही खरी व्यक्ति ऐतिहासिक होती काय? याबद्दल शंका आहे. हे नाथसंप्रदायी गुरू मूळ कोठे राहत होते हें कोणासच ठाऊक नाहीं. हे आपल्याच प्रदेशांत राहत होते असा बंगाली, हिंदी व मराठी लोकांचा दावा आहे. जालंदरनाथ व मैनावती यांची गोष्ट बंगाली असावी असें वाटतें. परंतु महाराष्ट्रांत सातारा जिल्ह्यांत गजेंद्रगड नांवाची एक टेकडी आहे व गोरक्षरा नांवाचें चिंचेचें झाड आहे. ही टेकडी व हें झाड मत्स्येंद्रनाथ—गोरक्षनाथांमुळें पवित्र आहेत असें दाखविण्यांत व सांगण्यांत येतें. नासिकजवळ ब्रह्मगिरीवर एका गुहेंत निवृत्तिनाथांना गहिनीनाथांनीं उपदेश दिला अशी आख्यायिका आहे. म्हणून नाथांचें माहेरघर बंगाल का महाराष्ट्र हा एक वादाचा विषय होऊन राहिला आहे. गोरक्षनाथ हे काल्पनिक नसून प्रत्यक्ष जिवंत संत होते असें दिसतें. गहिनीनाथांनीं श्रीनिवृत्तिनाथ व श्रीज्ञानेश्वर यांना आत्मज्ञान शिकविलें, यावरून ते इतिहासप्रसिद्ध पुरुष होते हें

उघड आहे. गोरक्षसंहितेसारखे ग्रंथ गोरक्षनाथांच्या नांवावर अद्यापि प्रसिद्ध आहेत. यावरून हे देखील इतिहासप्रसिद्ध असावेत, असें अनुमान काढणें योग्य होईल. याप्रमाणेंच सर्व धर्मांचा व पंथाचा उगम अज्ञात व व गूढ राहतो; पुढें त्यांची वाढ झाल्यावर ते पंथ, ते धर्म श्रेष्ठ दिसूं लागतात. नाथ-संप्रदायाच्या बाबतींत हीच गोष्ट खरी ठरते. श्रीज्ञानेश्वरांचा अजरामर ग्रंथ म्हणजे या संप्रदायाचें पक्व गोड फळ होय. तें लोकांना पाहावयास व चाखावयास मिळालें व श्रीज्ञानेश्वरांनीं मिळविलेल्या या अध्यात्मपरंपरेचें ज्ञान किती श्रेष्ठ प्रतिच होते हेंहि त्यावरून लोकांना सुविदित झालें. त्या काळीं नाथसंप्रदायी संत देशभर भटकत राहत असावेत. म्हणून बंगाल, उत्तर हिंदुस्थान व महाराष्ट्र या सर्व ठिकाणी गेले असावेत हे स्वाभाविक आहे. त्यांचे शिष्य कोण होते हे मात्र कोणास माहीत नाहीं. त्यांनी श्रीज्ञानेश्वरांसारखा एकच शिष्य निर्माण केला असता तरी त्यांच्या आध्यात्मिक जीवनाचे सार्थक झालें असतें असें म्हणण्यास हरकत नाहीं.

## ६. श्रीज्ञानेश्वरांचे पूर्वज.

श्रीज्ञानेश्वरांच्या पूर्वजांपैकीं त्र्यंबकपंत सुप्रसिद्ध होते. ते श्रीज्ञानेश्वरांचे खास पण-जोबा होत. यांना गोरखनाथांकडून अनुग्रह मिळाला. याचा उल्लेख मागें आलाच आहे. श्री. भिंगारकरांनीं जो दस्तऐवज प्रसिद्ध केला आहे त्यावरून देवगीरीच्या राजांनीं त्यांस इ. स. १२०७ सालीं तालुकदाराच्या हुद्यावर नेमलें होतें असें सिद्ध होतें श्री. भिंगार-करांनीं प्रसिद्ध केलेल्या आणखी कांहीं कागदपत्रांवरून त्र्यंबकपंतांच्या चिरंजीवांना म्हणजे हरिपंतांना देवगिरीच्या राजांनीं शके ११३५ (इ. स. १२१३) सालीं सेनापति नेमल्याचें स्पष्टपणें सिद्ध होतें. श्रीज्ञानेश्वरांच्या वंशपरंपरेस त्र्यंबकपंतांच्या दुसऱ्या एका मुलापासून म्हणजे गोविंदपंतापासून सुरुवात होते. श्रीज्ञानेश्वरांचे वडील विठ्ठलपंत हे गोविंदपंतांचें चिरंजीव होत. आतां विठ्ठलपंतांच्या कुलविस्ताराचा विचार आपल्यास करावयाचा आहे.

## ७. विठ्ठलपंतांचें चरित्र

श्रीविठ्ठलपंतांकडे आपेगांवचें कुळकर्णीपण पिढ्यानुपिढ्या चालत आलें होतें. आपेगांव गोदावरीच्या तटाकीं कांहीं अंतरावर वसलेलें एक खेडें आहे. आळंदीचे कुळकर्णी श्रीसिद्धोपंत यांची मुलगी रखमाबाई हिच्याशीं विठ्ठलपंतांचा विवाह झाला. गोविंदपंतांच्या मरणानें विठ्ठलपंतांना फार दुःख झालें व त्यांना आपल्या आयुष्याचा फार कंटाळा वाटूं लागला. सिद्धोपंतांनीं विठ्ठलपंतांस सहकुटुंब आपल्याकडे राहावयास बोलाविलें व एक मुलगा झाल्यावर संसार त्याग करण्याचा सल्ला दिला, असें श्री. भिंगारकरांनीं प्रसिद्ध केलेल्या पत्रावरून दिसतें. त्याप्रमाणें

विठ्ठलपंत आळंदीस राहावयास गेले. परंतु, बरीच वर्षें झालीं तरी विठ्ठलपंतांना मूल झालें नाहीं. यामुळें त्यांना तीव्र विरक्ति वाटूं लागली. एके दिवशीं अर्धवट झोंपेत असलेल्या आपल्या पत्नीची संमति घेऊन ते घर सोडून निघाले व काशीस जाऊन राहिले. तेथें त्यांनीं रामानंदस्वामींकडून किंवा त्यांच्या कोणातरी शिष्याकडून संन्यास घेतला. विठ्ठलपंत "आनंद" किंवा "आश्रम" परंपरेचे संन्यासी झाले, याबद्दल मतभेद आहे. ते 'आनंद' परंपरेचे होते, असें नाभाजी व महिपति यांचें म्हणणें आहे, तर नामदेव व निळोबांच्या मतें ते 'आश्रम' परंपरेचे होते; नामदेव विठ्ठलपंतांना "चैतन्याश्रम" म्हणतात. नंतर ते गृहस्थाश्रमी कसे झाले हे नामदेवांनींच सांगितलें आहे. विठ्ठलपंतांचे गुरु श्रीरामानंद तीर्थयात्रेस निघाले व गांवोगांवीं हिंडत ते एकदां आळंदीस आले. तेथें त्यांची व सिद्धेश्वरपंत व रखुमाबाईची गांठ पडली. विठ्ठलपंत बेपत्ता झाल्यामुळे ते झुरणीस लागले होते. हें पाहून व त्यांची विनवणी ऐकून श्रीरामानंद यांचें हृदय द्रवलें. विठ्ठलपंतांची बायको जिवंत असतां त्यांस न कळत आपण संन्यासदीक्षा दिली हें त्यांना समजल्यावर, काशीस गेल्याबरोबर त्यांस परत पाठविण्याचें आश्वासन त्यांनीं सिद्धेश्वरपंतांना दिलें. त्याप्रमाणें काशीस परत आल्यावर श्रीरामानंदांनीं विठ्ठलपंतांस रागें भरून रखुमाबाईच्या पोटीं एक मुलगा होईपर्यंत पुन्हां गृहस्थाश्रम पत्करण्यास त्यांस बजावून सांगितलें व आळंदीस परत पाठविलें. पुन्हां गृहस्थाश्रम स्वीकारल्यावर विठ्ठलपंतांना रखुमाबाईच्या पोटीं एकामागून एक अशी चार मुलें झालीं. हीं सर्व आपेगावीच जन्मली असें दिसतें. त्यांचीं नांवें अनुक्रमें निवृत्ति, ज्ञानेश्वर, सोपान व मुक्ताबाई अशी ठेवण्यांत आलीं. हीं नांवें म्हणजे आत्मज्ञानाच्या वाढत्या अनुभवांतील स्थित्यंतराचें रूपकात्मक वर्णन आहे, अशी कित्येकांची समजूत आहे. पण ती चुकीची आहे. कारण या चौघाहि थोर व्यक्तींचा समग्र इतिहास, त्यांचीं प्रत्यक्ष कार्यें व त्यांच्या समाधी प्रत्यक्ष अस्तित्वांत असल्यामुळें वरील समजूत किती निराधार आहे हें सांगणें नलगे. त्यांच्या जन्मतिथीबद्दल मात्र पुष्कळ मतभेद आहेत.



# श्रद्धेशिवाय फळ नाहीं

## आपलें खरें साध्य कोणतें ?

"कितीतरी दिवसांपासून आम्हीं नामस्मरण करीत आहोंत; परंतु त्यामुळें जो फायदा होतो म्हणून सांगतात, त्याचा कांहीं अनुभव आम्हांला आला नाहीं."

अशी तक्रार नेहमीं कित्येक लोकांकडून ऐकण्यांत येते. त्याला समर्पक उत्तर आहे. भगवंताचा नाममहिमा, नामस्मरणाचा महिमा अगाध आहे. तो शब्दांनीं वर्णन करून कदापि सांगतां येणार नाहीं. जितकें नामस्मरण करावें तेवढें थोडें व त्याचा फायदाही अमाप! ज्यांना त्यापासून लाभ झालेला दिसत नाहीं त्याला कारणें एक दोन नाहीं असंख्य असतात. आपल्याकडून वेळोवेळीं किंवा सतत नाना अपराध घडत असतात. एकीकडे भगवंताचें नामस्मरण करायचें आणि दुसरीकडे साधूसंतांची, सत्पुरुषाची मनसोक्त निंदा करायची. नांवें वेगवेगळी असली तरी तीं एकाच देवाधिदेवाची भिन्न नांवें आहेत. असें असतां राम, हरी, विष्णु यांत भेदभाव करणें. विष्णु व शंकर भिन्न आहेत असें मानणें. आपल्या धर्म-ग्रंथांबद्दल श्रद्धा न बाळगणें. गुरूवर श्रद्धा न ठेवणें, नामसंकीर्तन मनापासून न करता कशीबशी वेठ वावरणें. त्यावर श्रद्धा असल्याशिवाय फळ कसें मिळणार ? इतर धर्मांची निंदानालस्ती करण्यांत आनंद मानणें.

अशीं एक दोन किती कारणें सांगावींत ? हे जे आपल्याकडून प्रत्यहीं घडणारे गुन्हे सांगितले त्यांचा त्याग करण्याचा विचार कधीं आपल्या मनांत आला आहे का ? त्यांना चिकटून राहून नामजपाचें फळ आपण कसें बरं मिळविणार ?

ते दुर्गुण साफ सोडून द्या. आणि मग पहा! जी गोष्ट करतां तिच्यावर तुमची संपूर्ण श्रद्धा पाहिजे. तिच्यावर प्रेम पाहिजे—भक्ति पाहिजे. श्रद्धा आणि प्रेम यांशिवाय सारें व्यर्थ आहे.

तुकोबा म्हणतात—

'आम्हीं आतां निर्भय झालों । जिंकोनि आलों कळिकाळ ॥ नामें एका विठोबाच्या । यश आमुच्या पाठीशीं ॥ मागें पुढें सांभाळिलें । सफल झालें कर्तव्य ॥ तुका म्हणे सत्ता शिरीं । निर्भय करी सेवका ॥

श्रद्धा हा अमोलिक गुण आहे. तुम्हीं ज्या भगवंताचें नामस्मरण करतां त्यावर तुमची अढळ व संपूर्ण श्रद्धा पाहिजे. श्रद्धेनें तुम्हीं गामस्मरण करूं लागला म्हणजे तुमचा पुढील मार्ग आपोआप मोकळा होत जाईल. मग तुम्हांला तोच मार्गदर्शक होईल आणि तुम्हांला अपेक्षित फळ देईल.

× × ×

जन्माला येऊन उद्योगधंद्याला लागल्यानंतर सुखोपभोगासाठीं जरूर असलेलीं सर्व साधनें जवळ करण्यांत यश मिळविलें. लोकांकडून मान सन्मानही पुष्कळ मिळविला. संपत्ति मुबलक मिळविली. नोकर चाकर घरदार सर्व कांहीं संपन्नता आहे; परंतु जीवनाचा हाच का उद्देश ? यासाठींच का मनुष्यजन्म मिळविला ? हा विचार कधीं-काळीं मनांत डोकावतो का ?

या ज्या उलाढाली केल्या त्यांत किती लोकांना लुबाडले, किती लोकांचे शिव्याशाप घेतले, किती लोकांना फसविलें, किती लोकांची निराशा केली ? याचें कांहीं मोजमाप ! आणि हें सारें कशासाठीं आणि कोणासाठी ? अंतीं तुम्हांला त्याचा काय उपयोग ?

या उलाढालींत जीं पापकर्में घडली त्याबद्दल वेळ येईल तेव्हां तो जन्मदाता शासन नाहीं का करणार ? याची मनाला कांहीं तरी खंत !

त्यापेक्षां वाजवीपेक्षां सुखाचीं साधनें जवळ करण्यांत ऐन उमेदीचा काळ खर्ची न घालतां मानसन्मानाच्या मार्गें किंवा लौकिका मार्गें न लागतां शांतपणें देवानें दिलेल्या स्थितींत समाधान मानून हातून होईल ती दुःखितांची व पीडितांची सेवा करण्यांत आयुष्याचा कांहीं भाग खर्च झाला असता तर त्या जीवनखंडाला मोल नसतें का आलें ? त्यापायीं शाश्वत समाधानानें सुख नसते का मिळालें ? तुम्हांला कोणी नाहीं विचारीनात, कोणी तुमचा मानमरातब न ठेवोत. काय त्याचा उपयोग तुम्हांला ? कर्तव्याचरण करण्यांत खरा आनंद आहे; इमानेंइतबारें हातून होईल ती दुसऱ्याची सेवा करण्यांत समाधान आहे.

त्यामुळेंच आयुष्याच्या अखेरीस तुम्हांला कृतार्थतेचा मनमुराद आनंद मिळेल. आणि त्याच्यासाठीं तर या जगांत आपण जन्म घेतला. जीवनाचें खरें सार्थक त्यांतच आहे.

# साहेबानें नवी दृष्टि दिली !

अनुवादक : पी. बी. के.

**अभिमान बाळगण्याजोगें आमच्यापाशीं कांहीं आहे असें आम्हांला वाटत नाहीं. परकीयांचें तेवढें श्रेष्ठ ही आमची भावना. स्वत्वाला मुकून बसलेले आम्हीं ! परकीयांनीं आमच्या डोळयांत अंजन घालून आम्हांला खडबडून जागे करावें लागतें–कसें तें या लेखांत पहा ! —संपादक**

एअर इंडियाच्या बोइंग ७०७ विमानानें आमचा प्रवास चालू होता. इतक्यांत विमान होस्टेजचा आवाज कानीं पडला. "आतां थोड्याच वेळांत जिनिवा स्टेशन येईल. प्रवाशांनीं तयारीत रहावें."

## तिघांची मैत्री

त्या विमानांत आम्हां तिघांची मैत्री जमली होती. भट्टाचार्य, रॉबर्ट हॉफ व मी ( नलिनीकान्त मेहता ) आम्हां तिघांनाही जिनिवा येथें उतरायचें होतें. तेव्हां आम्हीं तयार झालों.

रॉबर्ट साहेब अमेरिकन होते. भट्टाचार्य व मी कॅलिफोर्निया युनिव्हर्सिटीत एम्. एस. च्या शिक्षणासाठीं जात होतों. न्यूयॉर्कला जाण्यापूर्वी ५–६ दिवस आम्हांला स्वीत्झर्लंडमध्यें घालवायचे होते. रॉबर्टही आमच्याबरोबर उतरणार होते व आमच्या-बरोबर आम्हीं राहूं त्या हॉटेलांत रहाणार होते.

चार दिवस आम्हीं हिंडण्याफिरण्यांत घालविले. एकमेकांपासून विभक्त होण्याचा एकच दिवस मध्यें राहिला होता. आम्हीं जीं जीं दृश्यें स्थळें व देखावें पाहिले त्यासंबंधी आमच्या गप्पागोष्टी चालू होत्या.

'या जगांतील ज्याला नंदनवन किंवा स्वर्गलोक म्हणतां येईल तो एकदांचा पाहून घेतला,' मी म्हणालों.

भट्टाचार्यांनीही माझ्या सुरांत आपला सूर बेमालूमपणें मिळविला.

कधीं काश्मीर पाहिला आहे ?

रॉबर्टसाहेब मात्र आमच्याकडे तटस्थतेनें पहातच राहिले !

" मि. मेहता ! काय ? आपण या भागाला जगांतील स्वर्ग म्हणतां ? " या भागाला या शब्दावर जोर देऊन ते म्हणाले, " तुम्हीं दुसऱ्या कोणत्याही उत्तमोत्तम स्थानांस व सौंदर्यस्थळांस अजून भेट दिली नाहीं का ? "

" नाहीं ! अमेरिकेंतील कितीतरी सुंदर स्थळें मला पहायची आहेत ! "

" मि. मेहता ! आपण कधीं काश्मिरला भेट दिली आहे कीं नाहीं ? "

" नाहीं हो ! अजून नाहीं ! "

" कोडाई कॅनॉल ? "

" नाहीं ! "

" मि. मेहता ! आपण दार्जिलींग येथून सूर्योदय कधीं पाहिला आहे का ?

" नाहीं ! "

" बरं ! उटीला तरी जाऊन आलां अहांत का ? "

" नाहीं ! "

जरा लक्ष द्या

" बस्स झालें ! अधिक काय विचारायचें ? आतां मी काय बोलतों त्याकडे जरा लक्ष द्या. मी तुमचा सारा भारत पाहिला आहे असें अभिमानानें सांगूं शकत नाहीं, परंतु कांहीं महत्त्वाचा भाग तरी पाहिला आहे. परंतु तुम्हीं ? किंवा आजकालचा शिक्षकवर्ग किंवा तुमच्यासारखा परदेशीं जाणारा विद्यार्थीवर्ग ! त्यांना काय वाटतं माहीत आहे ? त्यांना आपल्या देशांत प्रेक्षणीय कांहीं आहे असं वाटतच नाहीं ! जे कांहीं पहाण्यासारखं आहे तें सारं परदेशांत ! अशा हीन गंडानें भारतांतील बहुजन समाज व्यापलेला आहे ! स्वदेशांत पहाण्यासारखे काय काय आहे याचा त्यांना पत्ताच नाहीं ! मी अमेरिकेंत असतां माझ्या घरीं तीन भारतीय विद्यार्थी आले होते. गुप्त, शहा व चौधरी.

गीता, रामायण महाभारत

" एके दिवशीं आम्हीं सहज गप्पागोष्टी करीत बसलों होतों. तेव्हां गीतेंतील मर्म मला थोडें समजावून द्या असं मी म्हणालों. ते कांहीं तरी सांगून वेळ मारून नेण्याचा प्रयत्न करूं लागले. दुसऱ्या दिवशींहि तोच विषय निघाला. पुन्हां गडबड गुंडा ! मग मी विचारले कीं आपल्यापैकीं गीता कोणी कोणी वाचली आहे ? उत्तर

तिघांहीकडून नकारार्थी मिळालें. मग मी विचारलें, रामायण, महाभारत तरी कोणी कोणी वाचलं आहे ? त्याचेंही उत्तर नकारार्थी मिळालें.

## तुळसीदास रामायण

उत्तर प्रदेशांतील कांहीं खेड्यापाड्यांतून मी हिंडलों आहें. तिकडे रात्रींच्या निवांत वेळीं तुळसीदास रामायण वाचण्याची व सभोंवार बसून तें ऐकण्याची प्रथा आहे. मीही तें ऐकायला बसत असें व त्या भोळ्या भाबड्या लोकांच्या भावना मनांत टिपून ठेवीत असें. तें रामायण ऐकून ऐकून मला मोडकें तोडकें हिंदी बोलायला येऊं लागलें. त्या अशिक्षीत लोकांनीं परंपरेनें आपल्या धार्मिक उच्च भावना जिवंत ठेवल्या आहेत. त्यांचें व्यवहार ज्ञान त्यांचा स्वाभिमान वाखाणण्यासारखा असतो. तुम्हीं सुशिक्षीत म्हणविणाऱ्यांनीं मात्र तो खुंटीला गुंडाळून ठेविला आहे. दिल्लींत मला उच्च शिक्षण घेतलेले असे कांहीं विद्यार्थी भेटले कीं, त्यांना वेदव्यास, वाल्मिकी यांच्या ऐवजीं शापेनहार, स्पेन्सर हेच जास्त माहिती !

## वेदव्यास वाल्मिकी

" भारतांतून यूरोप अमेरिकेंत येणाऱ्या असंख्य विद्यार्थ्यांना गीता, महाभारत रामायण या महान् ग्रंथांची कांहीं माहिती नसते. त्या ग्रंथांची व त्यांच्या निर्मात्याचीं नांवें घ्यायला ते लाजतात ! वेद, उपनिषदें यांची निर्मिती आमच्या देशांत झाली, वेदव्यास, वाल्मिकीसारखे थोर महापुरुष आमच्या देशांत जन्मले, स्वामी विवेकानंद हे भारतीय होते असें मान उंच करून तुम्हांला कां सांगतां येऊं नये ? "

रॉबर्ट यांचा आवाज चढत चालला होता. ते आम्हांला अगदीं वेगळ्या वातावरणांत घेऊन जात होते. श्वास घेण्यासाठीं थोडा वेळ ते थांबले, आणि नंतर बोलूं लागले. ' देवदास ' तुम्हीं कधीं वाचला आहे का ? तो वाचल्याशिवाय हॅम्लेट म्हणजे जगांतील एक दुःखपर्यवसायी नाटक आहे असें म्हणण्याचा तुम्हांला काय हक्क ? सत्यजित रॉय यांचीं चित्रकलाकृति पाहिल्याशिवाय पाश्चात्यांच्या कोणत्याही चित्रपटाबद्दल बोलण्याचे धाडस तुम्ही कां करावें ? बिस्मिल्लांची सनई किंवा रविशंकरची सतार ज्यानी ऐकलीच नाहीं त्यानी पाश्चात्य देशीय जॉर्ज किंवा ट्रंपेट यांची वाखाणणी करावी कशाला ?

## स्वदेशाभिमानाला पारखे कां ?

" आपण कोणत्याही गोष्टीबद्दल पसंती दर्शवा. तो प्रश्न महत्त्वाचा नाहीं; परंतु आपल्या देशांत जें जे कांहीं श्रेष्ठ व वाखाणण्याजोगें आहे त्यासंबंधी बोलायला तुम्हांला लाज कां वाटावी ? स्वाभिमान, स्वदशाभिमान या गुणांना तुम्ही पारखें कां व्हावे ? पाश्चात्यांचें जें चांगले असेल तें चांगले म्हणा. त्याचा स्वीकार करा

परंतु स्वत्वाला अजिबात पारखे होऊं नका. स्वदेशांतसुद्धां अभिमान बाळगण्यासारखें कांहीं ना कांहीं आहे याचा विसर पडूं देऊं नका, एवढंच मला म्हणायचें आहे.

मी व मेहता दिङ्मूढ झालों. काय बोलावें तें समजेना. रॉबर्टनें आमच्या डोळ्यांत ( मनाच्या ) झणझणीत अंजन घातलें होतें. आम्हीं आंधळ्यासारखे वागत होतों. त्यानीं आम्हांला डोळस बनविलें. आम्हीं झोपेंत होतों म्हणा ना. रॉबर्टनें आम्हांला खडबडून जागे केलें.

दुसरा दिवस उजाडला. एकमेकांचा निरोप घेण्याचा तो दिवस होता. कारण रॉबर्ट पॅरीसला व आम्हीं न्यू यॉर्कला जाणार होतों.

हस्तांदोलन करीत असतां मी रॉबर्टला म्हणालों, " आम्हीं तुमच्या अमेरिकेंत चालतों. तुम्हीं आम्हांला नवी दृष्टि दिली. त्या नव्या दृष्टीनें आम्हीं अमेरिकेंत वागूं एवढंच सांगतों."

[ 'अखंड आनंद' मधील एका लेखाच्या आधारें ]



## " साई भक्तांस अमूल्य संधी "

श्री साईलीला १९५८ ( त्रैमासिक ) एप्रिल ते १९५९ जानेवारी १९५९ ( मासिक ) एप्रिलपासून १९६५ मार्चपर्यंतचे, थोडे जुने अंक ( विशेष अंकासह ) शिल्लक असून, ते विक्रीस काढले आहेत. फुटकळ अंकास, ( विशेष अंकासह ) प्रत्येकीं दोन आणे २. पोष्टेज निराळे. ( एक अंकासाठी पोष्टेज १० पैसे, ) ( दोन अंकास १५ पैसे, ) ( तीन अंकास २० पैसे. ) ( चार अंकास २५ पैसे. ) वरीलप्रमाणें जुन्या अंकासाठी-किंमत टपाल खर्चासह ( स्टॅंप-तिकिट ) अगर मनीऑर्डरनें पाठवावी.

संपादक

श्री साईलीला मासिक

# मोत्यांची माळ

संग्राहक : आप्पाराव

पुरुषोत्तम—उत्तम पुरुष कोणाला समजायचें ? ज्याच्याठायीं स्वार्थ, अहंकार, दांभिकपणा व क्रोध नाहीं, जो मानसन्मानाची कोणाहीकडून कधीं अपेक्षा करीत नाहीं, ज्याचें दैनंदिन आचरण अत्यंत शुद्ध आहे, तसेंच ज्याला पहातांच किंवा ज्याची वाणी ऐकतांच मनांत प्रेमभाव उत्पन्न होतो, परमात्म्याची आठवण होते, अंतःकरण आनंदानें व शांतीनें व्यापलें जातें, एवढेंच नव्हे तर भगवंतावरील आपली श्रद्धा दृढ होते. तोच पुरुषोत्तम होय. असा पुरुषोत्तम बनण्यासाठीं आपण अविरत झटावयाचें आहे.

× × ×

हा मनुष्य जन्म किती दुर्लभ आहे ? मोठ्या पुण्याईच्या बळावर तो प्राप्त झाला. आणि आपण त्याचा दुरुपयोग कोण कोणत्या रीतीनें व मार्गांनीं करतो बरें ! नानाप्रकारचीं व्यसनें आम्हीं स्वतःला लावून घेतों व तीं व्यसनें कितीही घातुक असलीं तरी तींच आम्हीं सुखाचीं साधनें मानतों. शक्ती असेपर्यंत त्या व्यसनांचीच कांस धरून जीवन खर्च करतों ! त्यामुळें काय होतें ? मौल्यवान् आयुष्य फुकट जातें. आपण मनुष्य जन्माला आलों कशाला आणि त्याचा आपण दुरुपयोग कशारीतीनें केला याची मनाला निदान खंत तरी वाटावी !

हा झाला अप्रबुद्ध मूर्ख माणसांचा मार्ग ! शहाणी व बुद्धिवान माणसें या आड मार्गानें कधींही जात नाहींत. त्यांना हित अहित समजतें आणि तें ज्याला समजत नाहीं तो माणूस तरी कसा समजावा !

× × ×

शहाण्या माणसाला आपलें आयुष्य सत्कारणीं कसें लावावें हें समजतें. तो आपल्या आयुष्याचा एकही क्षण निरर्थक दवडणार नाहीं तर तो प्रत्येक क्षण स्वतःच्या व इतरांच्या उन्नतीसाठीं खर्च करील. तसे शहाणे आपण होऊं या. असा जो वागेल तोच, साईबाबांचा खरा भक्त. बाबांनी आपलें सारें जीवन, परदुःख निवारणार्थ, दुसऱ्यासाठीं झटण्यांत व झिजण्यांत खर्च केलें. तोच उच्च आदर्श आम्ही आपल्या पुढ ठेवूं या.


× × ×

प्रत्येक माणसाकडून कांहीं ना कांहीं अपराध वा गुन्हा घडतच असतो; परंतु अपराध घडल्यानंतर तसा अपराध पुन्हा घडूं नये याची मनाला तीव्र जाणीव झाली पाहिजे. घडलेल्या अपराधाबद्दल खुल्या अंतःकरणानें देवाची क्षमा मागितली पाहिजे, त्याबद्दल पश्चात्ताप झाला पाहिजे, म्हणजे दीनदयाळू देव क्षमा करीलच करील. हातून कोणताही लहानमोठा अपराध घडो. त्याबद्दल तीव्रतर खंत वाटली पाहिजे. तशावेळीं देवाला शरण जाऊन त्याच्याकडून क्षमेची याचना करण्याची बुद्धि आपल्यांत जागृत झाली पाहिजे; शरण आलेल्यास देव कधींही दूर लोटीत नाहीं. तो त्याला आपल्या उराशीं कवटाळून धरतो व त्याला कृतापराधाबद्दल क्षमा करतो.

—:०:—


## जनतेचें आरोग्य म्हणजेच राष्ट्राचें सामर्थ्य

**राष्ट्र सामर्थ्यवान करण्यासाठीं बलवान व्हा.** यासाठीं नियमित व्यायाम आणि खेळ खेळणें जरूर आहे. यासाठीं लागणारी उपकरणें म्हणजे डबेल्स, लेझीम... यासारखा सर्वश्रेष्ठ माल आम्ही बनवितो. नगरपालिका, जिल्हा परिषदा, ग्रामपंचायती, व्यायाम शाळा, विकास केंद्रें यांना माल पुरवितो.



लक्ष्मीविजय वुडन आर्टिकल ...

८५ बापू खोटे स्ट्रीट, जांभळी मोहोल्ला, मुंबई ३

प्रोप्रायटर—डी. एच्. सालरकर

# समर्थभक्त श्रीआत्मारामबुवा मंदिर स्थापनेचें कार्य

लेखक : अनंत वा. मराठे

श्रीसमर्थांनीं महाराष्ट्रधर्माच्या प्रसारासाठीं ठिकठिकाणीं मठ स्थापन केले होते; आणि त्यांचे शिष्य–प्रशिष्यही या मठांचें जाळें सर्वत्र पसरीत होते.

या मठांपैकींच शिरगांव येथील मठ हा एकोणिसाव्या शतकांतील एक प्रसिद्ध मठ होता. हा मठ चाफळपासून दोन कोसांवर आहे. तेथील मठांत श्रीसमर्थांचाही कांहीं काळ वास होता.

कल्याणस्वामी, त्यांचे बंधु दत्तात्रयस्वामी व मातुःश्री असे त्रिवर्ग प्रथम याच मठांत राहत असत. पुढें कल्याणस्वामी डोमगांवीं गेले व दत्तात्रेयस्वामी शिरगांवींच राहिले. दत्तात्रेयस्वामींची समाधि शिरगांव मठांतच आहे.

श्रीदत्तात्रेयस्वामी हे गृहस्थाश्रमी होते. त्यांचे पुत्र राघवस्वामी; राघवस्वामींचे पुत्र यशवंतस्वामी व यशवंतस्वामींचे पुत्र भीमस्वामी, अशी या मठाची परंपरा आढळते.

आमचे चरित्रनायक श्रीआत्मारामबुवा हे या शिरगांव मठाचेच सांप्रदायी होते.

### श्रीआत्मारामबुवांचें देशपर्यटन

श्रीरामदासस्वामी स्वतः अविवाहित होते; किंबहुना विवाह नको म्हणूनच त्यांनीं ऐन मुहूर्त साधण्याच्या वेळीं 'सावधान' शब्द ऐकून विवाहमंडपांतून पळ काढला होता हें प्रसिद्धच आहे. तथापि त्यांनीं जो सांप्रदाय पुढें चालू केला त्यांत विवाहाला बंदी नव्हती. विवाहित नि अविवाहित असे दोन्ही प्रकारचे लोक या सांप्रदायांत येऊं शकत.

आपल्या आत्मारामबुवांचें लग्न लहानपणींच झालेलें होतें. त्यांच्या मुलीची एक मुलगी अहमदाबादच्या राममंदिरांत पाहिल्याचें कित्येक लोक सांगतात. तथापि वैयक्तिक संसारांत गुरफटून न राहतां रामदासस्वामींप्रमाणेंच विश्वाची चिंता वाहात

त्यांनीं भरतखंडभर प्रवास केला होता. या प्रवासांत काशीक्षेत्रीं असतां त्यांना एक स्फटिकाचें शिवलिंग सांपडलें. तें त्यांनीं बरोबर घेतलें आणि काशियात्रेहून आल्यावर 'चिंचरे' उपनावाचे त्यांचे एक भाचे सावंतवाडीला होते, त्यांच्या घरीं ते रहायला आले. तिथें त्यांचा मुक्काम बरेच दिवस होता. मधूनमधून ते सावंतवाडीच्या परिसरांतील खेड्यापाड्यांतून फिरत असत.

### श्रीशंकराचा दृष्टान्त

अशेच एकदां वालावल नांवाच्या गांवीं गेले असतां त्यांना एका रात्रीं श्रीशंकराचा असा दृष्टांत झाला कीं 'मी इथल्या नजीकच्या वाण्याच्या घरीं त्याच्या पाट्यावर आहें. रोज माझा मिरच्या वाटण्यासाठीं उपयोग होत आहे, त्यामुळें माझ्या अंगाची आग होत असते.. तेव्हां तूं मला तिथून नेऊन कुठें तरी सुस्थळीं ठेव!'

सकाळीं उठल्यावर त्यांनीं आसपास चौकशी केली तेव्हां त्यांना त्या वाण्याच्या घरच्या पाट्यावर असलेला वरवंटा रात्रीं स्वप्नांत पाहिलेल्या वरवंट्यासारखाच आहे असें आढळून आलें. त्यांनीं त्या वाण्याला सारी हकीकत सांगितली आणि त्याच्याकडून तो वरवंटा मागून घेतला आणि स्वच्छ धुऊन पुसून आपल्या बासनांत गुंडाळून ते पुन्हा सावंतवाडीला आले.

### सावंतवाडीचे भोसले

सावंतवाडी हें त्या वेळीं एक स्वतंत्र राज्य होतें. त्याचे अधिपति हे छत्रपति श्रीशिवाजीमहाराजांच्या भाऊबंदांच्या एका शाखेंतले होते. 'सावंत भोसले' असें त्यांचें उपनांव असून 'सरदेसाई परगणे कुडाळ व महालानिहाय' अशी त्यांची पदवी होती.

इंग्रजांनीं त्या बाजूला चंचुप्रवेश केला होता. तथापि या भोसल्यांच्या सावधानतेमुळें त्यांना हातपाय पसरण्याला अद्यापि वाव मिळाला नव्हता. या सावंतवाडीच्या राजघराण्याचें वैशिष्ट्य असें होतें कीं, त्यांच्या प्रत्येक पिढींत कोणाना कोणा संतपुरुषाचा त्यांच्या राज्यावरील आशीर्वाद असे आणि राजपदाधिष्ठित व्यक्तीही अशा सत्पुरुषाला मान देऊन त्यांच्या इच्छा-आकांक्षा पुऱ्या करीत असे.

या राजघराण्याचे संस्थापक पहिले खेमसावंत यांना 'गिरि'पंथीय 'भारतीबुवा' हे गुरु लाभले होते, तर दुसऱ्या खेमसावंतांच्या वेळी 'बालबुवा' हे या राजघराण्याचे पाठीराखे होते आणि ही परंपरा अगदीं अलीकडे कै. बापूसाहेबमहाराज यांच्या कारकीर्दीपर्यंत चालली होती. त्यांच्याच राज्यांत दाणोली येथें वास्तव्य करून राहिलेले 'श्रीसाटमबुवा' हे कै. बापूसाहेबांचे गुरुस्थानीं असून त्यांनीं तिथें एक सुंदर समाधिमंदिर बांधलेलें आहे. असो.

## आत्मेश्वराची स्थापना

आत्मारामबुवा सावंतवाडीला आले तेव्हां तिसरे खेमसावंत ऊर्फ 'राजश्री' हे सावंतवाडीचे अधिपति होते. ते त्या राज्यांत येणाऱ्या अनेक साधुसंतांचा नेहमीं परामर्ष घेत असत.

आत्मारामबुवांची कीर्ति त्यांच्या कानीं गेली. त्यांना झालेला साक्षात्कार त्यांना समजला. वालावलीचें शिवलिंग त्यांनीं सावंतवाडींत आणलें आहे आणि त्याची सावंतवाडींतच स्थापना करण्याचा त्यांचा उद्देश आहे हें त्यांना कळल्यावर त्यांनीं पुढची व्यवस्था केली. आणि ज्या ठिकाणीं या राजघराण्यांतील व्यक्तींच्या समाधि होत्या त्या 'माठेवाडा' नामक शहराच्या विभागांत असलेली एक प्रशस्त मोकळी जागा पसंत करून तिथें त्या लिंगाची 'आत्मेश्वर' या नांवानें स्थापना करविली. आत्मारामबुवांनी काशीहून जें लिंग आणलें होतें त्याचीही तिथेंच स्थापना करण्यांत आली नि त्याला 'प्राणेश्वर' अशा जोड नांवानें हे देवस्थान निर्माण झालें. ( सन १७९९ )

## मंदिरापुढील रामतीर्थ

आत्मेश्वराच्या या देवालयापुढे सुमारे तीनशें वर्षांपूर्वी कोणा सत्पुरुषाच्या प्रसादानें 'रामतीर्थ' नांवाचें शुभ्र गंगोदकासारख्या पाण्याचें एक उदककुंड निर्माण झालेलें आहे. या उदककुंडाला 'आत्मेश्वराची तळी' असें म्हणतात. तिचा विशेष असा आहे कीं, तींतील पाणी बाराही महिने एकसारखें भरलेलें असतें. आजूबाजूच्या लोकांनीं स्नानासाठीं व धुण्यासाठीं कितीही उपसा करून उपयोग केला तरी पुनः अल्पावधींत तें भरून राहातें ! असो.

## मंदिराच्या खर्चाची व्यवस्था—

वर सांगितलेले राजे तिसरे खेमसावंत व त्यांची राणी लक्ष्मीबाई यांची आत्मारामबुवांवर फार निष्ठा होती. देवांची प्राणप्रतिष्ठा झाल्यावर देवस्थानची पूजा-अर्चा, कीर्तन-पुराण, नैवेद्य-नंदादीप इत्यादींच्या खर्चासाठीं म्हणून प्रथम आपल्या राज्यांतल्या हद्दींत येणाऱ्या कापडावर दर गणगास एक 'दुड्डु' ( म्हणजे त्यावेळची अर्धी पै ) प्रमाणें येणारा वसूल त्यांनीं लावून दिला होता. शिवाय कांहीं नक्त नेमणूकही होती. पुढें सन १८०८–०९ च्या सुमारास त्या राज्यांतील 'सरंबळ' या गांवांतील २० 'भरे' म्हणजे ऐशीं खंडी भाताच्या उत्पन्नाची जमीन इनाम करून देण्यांत आली.

## आत्मारामबुवांचें मुंबईंत आगमन

वर सांगितल्याप्रमाणें सावंतवाडी येथें त्या देवस्थानची मनासारखी व्यवस्था झाल्यावर आत्मारामबुवा पुनः संचारासाठीं बाहेर पडले. ते प्रथम गोवा-कारवारच्या बाजूला जाऊन नंतर गुजराथेंत गेले. तिकडेही त्यांनीं राममंदिरांची स्थापना केली आणि तिथून मग १८२८ च्या सुमारास मुंबईंत आले. मुंबईंत त्या वेळीं गिरगांवच्या बाजूला सध्याच्या ठाकुरद्वारच्या परिसरांतला भाग जवळ जवळ मोकळाच होता. तिथें एक पुष्करिणी असून आजूबाजूच्या जागेचा स्मशानासारखा उपयोग करीत! बहुतेक जागा पाठारे प्रभु कुटुंबांच्या मालकीची होती.

कोकणी लोकांना 'भाऊचा धक्का' या नांवानें आगबोटी लागण्याची जी जागा माहीत आहे ती पूर्वी भाऊ रसूल या नांवाच्या प्रभु गृहस्थांच्या मालकीची होती. हे भाऊ रसूल त्या वेळच्या मुंबईच्या प्रसिद्ध धनिक समाजसेवकांत मोडत असत. ते वृत्तीनेंही धार्मिक व अंतःकरणाचे उदार होते.

## काळाराम मंदिराची स्थापना

आत्मारामबुवा मुंबईंत आल्यावर लौकरच त्यांची भाऊ रसूलांशीं गांठ पडली आणि बुवांच्या अंगच्या समाजसेवा, श्रीराम–उपासनेच्या प्रसाराची तळमळ आणि त्यांनीं आतांपर्यंत केलेलें कार्य यांचा रसूलांच्या मनावर परिणाम होऊन ते लौकरच त्यांचे शिष्य बनले.

पुढें भाऊंच्या मदतीनें अनेक लोकांकडून देणग्या वगैरे मिळवून आज गिरगांव रोड किंवा 'नाना शंकरशेट रस्ता' नांवानें प्रसिद्ध असलेल्या पण त्यावेळीं 'पालव रोड' नांवानेंच ओळखल्या जाणाऱ्या रस्त्यानजीक आत्माराम बुवांनी थोडी जागा खरेदी घेतली आणि तिथें एक मंदिर उभारलें.

रामदासी सांप्रदाय हा श्रीरामचंद्राचा उपासक आहे. श्रीरामचंद्र हेंच त्याचें आराध्य दैवत असतें आणि इतर देवतांविषयीं त्यांना आदर असला आणि त्यांची ते भक्तीही करीत असले तरी श्रीरामभक्तीचा प्रसार हेंच त्यांचें मुख्य उद्दिष्ट असतें. त्या उद्दिष्टानुसार आत्मारामबुवांनीं या मंदिरांत श्रीरामपंचायतनाची विधिपूर्वक स्थापना केली. (१८२८)

या मंदिराच्या घुमटींत एक शिवलिंग आहे. तें खालच्या श्रीरामाच्या मूर्तीच्या मस्तकाच्या बरोबर वरच्या बाजूला आहे. आत्मारामबुवा तिथें ध्यानस्थ बसत असत. त्याला कैलास भुवन असें म्हणतात. आज तिथें जाण्याला एक चिंचोळी वाट केलेली आहे. श्रावण महिन्यांतील सोमवार, वैकुंठ चतुर्दशी नि माघी शिवरात्र या दिवशीं भक्त मंडळीला तिथें प्रवेश मिळतो.

# एकनाथाची दिव्य काव्य प्रतिभा

*******************.*****************

## यतीमहाशय थक्क झाले !

**एखाद्या संस्कृत ग्रंथाचें मराठींत रूपांतर करणें हें महत् पाप समजलें जाई अशा सुमारें चारशें वर्षांपूर्वीच्या काळांत जनार्दनस्वामींचे शिष्य एकनाथमहाराज अवतरले. त्यावेळीं काशीच्या संस्कृत पंडितांनीं त्याच्याविरुद्ध गहजब केला व त्याला तेथील एका विद्वान् यतीपुढें खेचलें ! परंतु वाद-विवादांत यती हरले व शेवटीं जय झाला एकनाथमहाराजांचा ! कसा तो पहा !**

**—संपादक**

एकनाथांची कीर्ति केवळ साधुत्वसंबंधाचीच नसून कवींमध्येंही त्याची गणना आहे. प्रतिष्ठानपुरींतील कित्येक स्मारकें ज्याप्रमाणें एकनाथाच्या साधुपणाविषयीं साक्ष देत आहेत त्याप्रमाणेंच त्यानें केलेले मोठमोठाले लोकमान्य ग्रंथ त्याच्या कवित्वाविषयीं उत्तमप्रकारचा पुरावा देत असून कांहीं काव्यें तर खऱ्या रसिकांस तल्लीन करून सोडण्यासारखीं आहेत.

कवि या संबंधानें एकनाथाच्या आंगचा पहिला गुण म्हटला म्हणजे तात्कालिक स्फूर्ति हा होय. कोणत्याहि भाषेंतील कविता घेतली तरी ज्या कवितेंत कवीची स्वाभाविक स्फूर्ति दिसून येते, तीच कविता खऱ्या रसिकांस विशेष प्रिय असते. हा तात्कालिक स्फूर्तीनें कविता करण्याचा गुण एकनाथाच्या आंगी पूर्णपणें वसत होता. त्याचें शीघ्रकवित्व इतकें जबरें असे कीं, अध्यात्मविषयासारख्या गहन विषयावरसुद्धां हजारों ओव्या, अभंग, पदें त्यानें चालतां चालतां करावीं. त्यानें जे जे मोठमोठाले ग्रंथ लिहिले आहेत व जीं जीं सरस काव्यें केलीं आहेत ते ते ग्रंथ, व तीं तीं काव्यें कोणत्या समयीं व कोणत्या स्थळीं रचलीं ह्याविषयींची हकीकत त्याच्या चरित्रांत वाचूं लागलें म्हणजे कवीच्या स्फूर्तीचें व त्याच्या विलक्षण कल्पनाशक्तीचें आश्चर्य वाटतें, आणि त्याचे भागवत-रामायणासारखे ग्रंथ पाहूनच मनुष्य अगदीं थक्क होऊन जातो. ह्या कवीनें कित्येक अभंग, ओंव्या, आरत्या, पदें हीं वाळवंटावर उपदेश करितां करितां रचिलीं आहेत; कित्येक पदें कीर्तनाच्या ऐन

रंगांत ठेवून दिलेलीं आहेत, व कांहीं उपदेशपर कविता तर प्राणोत्क्रमण होण्याच्या भयप्रद प्रसंगींही बनविल्या आहेत!! नाथाप्रमाणें कवित्वशक्तीची साहजिक भरारी फारच थोड्या कवींच्या ठिकाणीं दृष्टीस पडते. ओढून चंद्रबळ आणणारेच फार.

एकनाथाच्या कवितेचा दुसरा गुण सुबोधत्व व भाषेचा साधेपणा. हे दोन्ही गुण उत्तम प्रकारच्या काव्यांत अवश्य असले पाहिजेत. आणि त्याप्रमाणें ते नाथाच्या कवितेंत सर्व ठिकाणीं आढळतात. एकनाथाच्या कवितेंत कृत्रिमरचना मुदलींच नसून त्याचा कोणताही ग्रंथ पाहिला तरी त्याची भाषा शुद्ध, साधी आणि सोपी अशीच असते. शब्द गोड असून खुबीदार असतात, वर्णन करण्याची हातोटी चांगली असते, व त्यामुळें वाचक जसजसा निरनिराळे प्रसंग वाचीत जातो, तसतशा त्याच्या चित्तवृत्ति विकसित होत जातात. ज्ञानेश्वरी वाचीत असतां अर्थ न समजल्यामुळें व शब्द कठिण असल्यामुळें जसा ग्रंथ मध्येंच टाकावा लागतो, तसा प्रकार नाथाचे ग्रंथ वाचीत असतां होत नाहीं.

मुकुंदराज व ज्ञानेश्वर यांच्या मागून, लवकरच एकनाथ अवतरला; तथापि ज्ञानेश्वराप्रमाणें एकनाथाच्या कवितेंत जुनाट शब्दांचा भरणा मुदलींच नसल्यामुळें ह्या पैठणकर कवीची थोरवी बरीच समजली पाहिजे. उत्तम ग्रंथकार हे भाषेचे शिक्षक होत. कारण प्रत्येक काळच्या भाषेचें खरें स्वरूप त्या वेळच्या ग्रंथकारांवर पुष्कळ अंशीं अवलंबून असतें. आणि ते जें जें वळण घालून देतील, त्या त्या वळणावर भाषेची धांव बरीच असते. ही आपली कामगिरी एकनाथानें उत्तम रीतीनें बजाविली असें म्हणण्यास चिंता नाहीं. कारण आपल्या ग्रंथांतील शुद्ध आणि साध्या रचनेने एकनाथ जर भाषेला आळा न घालता, तर तिच्या 'ओखटें,' 'गोमटें,' शब्दांच्या भराऱ्या आजपर्यंतहि कदाचित् चालू असत्या.

वरील दोन्ही गोष्टीशिवाय कविसमूहामध्ये एकनाथाला विशेष मान देण्याचें तिसरें कारण प्राचीनत्व. कोणत्याही कवीच्या काव्याविषयीं विचार करावयाचा असल्यास लोकस्थितीकडे व वेळेकडे विशेष लक्ष दिले पाहिजे. बापानें लडिवाळपणें मुलाला खांद्यावर घेतलें असतां मी बापापेक्षां उंच आहे अशी घमेंडी मिरविणें जशी मुलाला योग्य नाहीं, त्याप्रमाणेंच प्राचीन विद्वानांच्या व कवीच्या परिश्रमांवर इमारत बांधणारे जे आधुनिक कवी व विद्वान् त्यांची तुलना प्राचीन कवीशीं न करितां समकालीन कवींबरोबर केली असतां साजेल. त्यांतून एकनाथाच्या वेळची लोकस्थिति त्याकाळीं महाराष्ट्र भाषेची होत असलेली पायमल्ली ह्यांचा विचार केला असतां भागवतरामायणासारखे उत्कृष्ट ग्रंथ उठवून देण्याला ह्या कवीची विद्वत्ता, काव्यशक्ति आणि धारिष्ट हीं जबर असलीं पाहिजेत असें सहज कबूल करावे लागतें. आतां अर्वाचीन कवीची तरफदारी करून कित्येक असें म्हणतील कीं, जुन्या कवींपेक्षां कित्येक अर्वाचीन कवींचीं काव्यें सरस आहेत, तरीही ह्या आक्षेपानें जुन्या कवींची योग्यता कमी न-

होतां अर्वाचीन कवींनीं आपलें कर्तव्य उत्तम रीतीनें केलें इतकें मात्र होईल. कारण कालानुरोधानें विद्येची अभिवृद्धि होणें हें साहजिक आहे. प्रख्यात टीकाकार जॉन्सन् एके ठिकाणीं म्हणतोः—'विद्यादेवीचें पूर्वरूप साधेभोळें असून कालाच्या अनंतत्वांत तिची अभिवृद्धि व उन्नति व्हावयाचीच, तथापि प्राचीनत्वाचा योग्य मान प्राचीन कवींना मिळणें अगदीं कायदेशीर आहे.'

स्वतंत्र कविता करण्यामध्यें एकनाथाची ज्याप्रमाणें आख्या आहे, त्याप्रमाणेंच एका भाषेंतील कवितेचा रस दुसऱ्या भाषेंत हुबेहुब उतरून देण्यामध्येंही त्याचा हातखंडा आहे. कित्येक कवि निव्वळ टीकाकार व अर्थप्रकाशक असल्यामुळें दुसऱ्याच्या कल्पनेवर त्यांच्या उड्या विशेष असतात, आणि त्यामुळें मर्मज्ञ लोकांच्या दृष्टीनें ते खरे कवि नसून केवळ अर्थवाहक ठरतात. परंतु एकनाथाच्या संबंधानें तसा प्रकार मुदलींच नाहीं. त्याची कल्पनाशक्ति अचाट असल्यामुळें स्वतंत्र कविता करण्यांत तो पुरा कसबी होताच, व त्याशिवाय संस्कृत काव्यांतील अर्थ मराठी भाषेंत व्यक्त करून दाखविण्याची करामतही त्याला चांगली साधली होती. म्हणून खरा कवि व उत्तम टीकाकार हीं दोन्ही विशेषणें ह्या पुरुषास शोभतात.

एकनाथ संस्कृत भाषेंत चांगलाच बाकबगार होता असें त्याच्या ग्रंथावरून स्पष्ट दिसतें. महाराष्ट्र भाषेची व त्या भाषेंत कविता करणाऱ्या कवींची इतकी गांजणूक जरी त्यावेळीं होत होती, तथापि अज्ञान लोकांस संस्कृत ग्रंथांतील रहस्य कळवून देण्यासाठींच ह्या कवीचे सतत परिश्रम असल्यामुळें, त्यांची जितकी थोरवी वर्णन करावी तितकी थोडीच. ह्या कवीनें आपल्या कवित्त्वाचा अपव्यय न करितां भागवतासारख्या अतिमहत्त्वाच्या ग्रंथांतील विषय, प्राकृतजनांस सुगम व्हावा म्हणून जागोजाग दृष्टांत देऊन सर्व काव्य प्रसादगुणयुक्त करून सोडलें आहे. मूळ अर्थ स्पष्ट करण्याकरिता एक एक श्लोकासांठीं कैक अध्याय खर्ची घातले आहेत व सोपे सोपे दाखले गोड गोड शब्दांनीं देऊन वेदांतासारखा कठीण विषयही अत्यंत मनोहर करून ठेविला आहे.

एकनाथाच्या ह्या गुणांविषयीं वाचकांची खात्री, व्हायची तेव्हां होईलच. तथापि इ. स. १५७३ मध्येंही काशीपासून रामेश्वरापर्यंत हा कवि, कवित्वाच्या संबंधानें कसा गाजला हें खालीं दिलेल्या मौजेच्या आख्यायिकेवरून वाचकांच्या चांगलें लक्षांत येणार आहे :—

भागवतासारख्या महत्त्वाच्या ग्रंथांतील विषय, प्राकृत लोकांस समजण्याचें कांहींच साधन नाहीं, हें पाहून एकनाथाला दिलगिरी वाटली व त्यानें त्या ग्रंथावर टीका लिहिण्याला सुरवात केली. भागवत टीकेचे पहिले दोन अध्याय तयार होत आहेत तोंच एका विद्वान् ब्राह्मणाला ते आवडून त्यानें ते दोन्ही अध्याय उतरून घेतले व नित्य वाचण्याचा त्यानें क्रम आरंभिला.

लवकरच पुढें तो रसिक विप्र काशीयात्रेस गेला. तेथें गेल्यावर नित्यानेमाप्रमाणें भागीरथीचे घाटावर ते दोन्हीं अध्याय मोठ्या उल्हासानें तो ब्राह्मण वाचीत आहे इतक्यांत घाटावरील ब्राह्मणांनीं हा सर्व प्रकार पाहिला. काशीसारख्या क्षेत्रांत घाटावर मोठ्या डौलानें बसून भागवतग्रंथाचें रहस्य मराठी भाषेंत वाचीत आहे, हे पाहून ' ही केवढी अंदाधुंदी आहे ' असें म्हणत सर्व लोक त्या ब्राह्मणाभोंवतीं जमले, व त्यास पकडून तेथील स्वामीकडे घेऊन गेले !

त्या यतीचें त्या वेळेस काशींत मोठेंच बंड असे. त्याच्याइतकी विद्वत्ता, काशीपासून रामेश्वरापर्यंत कोणाच्याच ठिकाणी नाहीं, अशी त्या वेळेस ख्याति होती. स्वामींनी ते दोन अध्याय पाहून मनांत विचार केला कीं, संस्कृत ग्रंथांतील रहस्याचा भलताच उपयोग जर हवा त्यास करूं दिला, तर महाराष्ट्रभाषेचें प्राबल्य होऊंन गीर्वाण भाषेंतील सर्व ग्रंथांवर टीका होऊं लागतील, ब्रह्मणांचें वर्चस्व कमी होऊन अन्य जात विद्वान् होईल, व शास्त्र्यांचें, पंडितांचें आणि यतींचें महत्त्व कमी होऊन, काशीक्षेत्राची आज संस्कृतभाषेच्या संबंधानें जी दिगंतरीं कीर्ति पसरलेली आहे, तीही अस्तास जाईल. असा विचार करून टीकेचा व टीकाकाराचा नाश करण्याविषयीं स्वामिमहाराजांनीं शिष्यवर्गास हुकूम फर्माविला. तथापि मूळग्रंथापासून टीका कितपत सुटलेली आहे तें पहावे, म्हणून दोन्ही पुस्तकें ताडून पाहिली, तेव्हां आश्चर्यानें थक्क होऊन गेले ! भागवतांतील मूळचा अर्थ अणुमात्र न सोडतां, ग्रंथार्थ इतका व्यक्त करून दाखविला होता, व भाषेचें सौष्ठव आणि सौरस्य इतके मजेदार होतें कीं, टाकेच्या व्यवधानांतून आलेल्या थोडक्याशा प्रभेनेंच यतिवर्य दिपून गेला !!

ही अजब कर्तबगारी पाहून यतीची टीकाकाराच्या कवित्वाविषयीं खात्री झाली. तथापि ही वेळ अशा ग्रंथकर्त्यास उत्तेजन देण्याची नाहीं, असें समजून " या अधमाधम महाराष्ट्र टीकाकारास एकदम पकडून आणा " अशी स्वामींनीं आज्ञा केली.

काशीक्षेत्रांतून हें धरण्याचें वारंट घेऊन स्वामींचे शिष्य पैठणास आले. नाथमंदिरांतील एकनाथाची कथा, श्रोत्यांची गर्दी, कथेकऱ्यांचे वक्तृत्व व त्याची उभयभाषेंतील विद्वत्ता हीं पाहून काशीकर शिष्य थक्क होऊन गेले. नंतर स्वामींची आज्ञा न घेतां मराठींत टीका लिहिली येणेंकरून यतींची अप्रतिष्ठा केल्याचा दोष ठेवून एकदम काशीस निघून येण्याविषयींचें आज्ञापत्र त्यांनीं एकनाथास दाखविलें.

आज्ञापत्र पाहातांच " मला स्वामींची आज्ञा शिरसावंद्य आहे " असें म्हणून हा कवि काशीस जाण्यास सिद्ध झाला. एकनाथाच्या शत्रूंस, ही त्याची अप्रतिष्ठा पाहून परम समाधान वाटलें. परंतु नाथाच्या पक्षाच्या लोकांसा ह्या कवीची ही मानखंडना पाहून महत् दुःख झालें. त्यांनीं पुष्कळ रदबदली केली. परंतु तें कांहींएक न जुमानतां यतींच्या शिष्यांनीं एकनाथास थेट काशीपर्यंत खेंचीत नेलें !

एकनाथ काशीस गेला त्या वेळेस त्यानें पहिली पंचाध्यायी तयार केली होती. ती त्याने आपणाबरोबर घेतली. काशीमध्यें एकनाथाच्या टीकेबद्दल चौहोंकडे गवगवा

झाला होता. एकनाथ आल्याबरोबर यतिरायांनीं बिचाऱ्या नाथावर शिव्यांचा यथेच्छ वर्षाव केला. परंतु कांहींएक उत्तर न देतां एकनाथानें शांतपणें तें सहन केलें.

संन्याशाचा तो थाट, त्याचा अत्यंत क्रोध व तो शिष्यांचा मेळा पाहून एकनाथास वाटलें कीं, यानें चतुर्थाश्रमाची मात्र विटंबना केली व आपण होता तसा घमंडानंदन राहिला !

मठामध्यें या पैठणकर कवीचा व काशीकर यतींचा वादविवाद सुरू झाला. काशींतील लोकांची स्वामीचे ठिकाणीं पूज्यबुद्धि असल्याकारणानें, एकनाथाची व व त्याचे पंचाध्यायीची प्रथम फारच विटंबना झाली; परंतु वादविवादांत एकनाथाचें वक्तृत्व, त्याचें वेदांतविषयक ज्ञान, त्याची सहनशीलता ही पाहून भोवतालचे लोकच केवळ साश्चर्य झाले, इतकेंच नाहीं पण त्या परमहंसासही अत्यंत अचंबा वाटला !

संन्याशास आश्चर्य वाटण्याचें पहिलें कारण हें झालें कीं, चतुर्थाश्रमी पुरुषाच्या ठिकाणीं जितकी शांति, दया, तितिक्षा, निरिच्छता, इंद्रियदमन आदिकरून गोष्टी अवश्य पाहिजेत, त्या गोष्टींचा शतांशही आपले आंगीं नसून ह्या सर्व गोष्टी एकनाथाचे ठिकाणीं त्यानें मूर्तिमंत पहिल्या. दुसरें कारण हें झालें कीं, संस्कृत ग्रंथावर टीका न करण्याविषयीं कोणतीं साधकबाधक कारणें आहेत तीं सांगण्याविषयीं एकनाथानें विनंती केली असतां, यतीकडून एकनाथाचें किंवा जमलेल्या प्रेक्षकांपैकीं कोणाचेंच समाधान करवलें नाहीं. तिसरें कारण असें झालें कीं, वेदांतविषयांत उभयतांच्या झटापटी चालल्या असतां, सहा शास्त्रांपैकीं वेळीं एकही शास्त्र उपयोगीं न पडतां, एकनाथाच्या कोटिक्रमापुढें संन्याशी फिका पडला. ह्या सर्व गोष्टींमुळें व एकनाथाची पहिली पंचाध्यायी मूळ ग्रंथाशीं हुबेहूब जुळल्यामुळें सर्व लोक थक्क होऊन गेले.

एकनाथाच्या विद्वत्तेच्या तेजामुळें दिपून जाऊन हा कोणी विलक्षण पुरुष असावा असें त्या यतीस व सर्व लोकांस वाटलें. नंतर राहिलेला सर्व ग्रंथ स्वामींच्या मठांत समाप्त झाल्यावर ज्या ग्रंथाला काशीकरांनीं गंगेंत फेकून देऊन अत्यंत विटंबना केली होती, त्याच ग्रंथाला त्यांनीं पालखींत मिरवून त्याचे सातसायास केले व एक एक प्रत प्रत्येक काशीकरानें उतरून घेतली.

मराठींत ग्रंथ लिहिणें किती जिवावरचें काम होतें, एकनाथ हा टीका करण्यांत कसा निष्णांत होता, व हा पैठणकर कवि कवित्वसंबंधानें काशीक्षेत्रांत कसा गाजला, ह्या सर्व गोष्टीं वरील आख्यायिका साक्ष देत आहेत.



# विनोबांची विचार पोथी

—संत विनोबा

१७५. अमूर्त आणि मूर्त ह्यामधील एकच सांधा–शब्द, म्हणजे वेद, म्हणजे नाम.

१७६. विद्यार्थ्यांपासून मी जितके शिकलो त्यामानानें मी त्यांना कांहींच शिकविले नाहीं.

१७७. "नको" नको.

१७८. भक्ताला 'स्वारब्ध' नाहीं.

१७९. स्वतंत्रतादेवीचा उपासक पोपटाला पिंजऱ्यांत ठेवूं शकणार नाहीं.

१८० पौर्णिमेला कृष्णाचा मुखचंद्र पहावा. अमावास्येला कृष्णाची अंगकांति पहावी.

१८१. कोणी कर्मयोगाला पिपीलिका आणि ध्यानयोगाला विहंगम म्हणतात. मी कर्मयोगाला इसापनीतींतल्या कासवाची आणि ध्यानयोगाला सशाची उपमा देतों. ध्यान करतां करतां केव्हां झोंप लागते, हें ध्यानांत येत नाहीं.

१८२. "काय रे! तुला झोंप लागली का?" एक म्हणतो, 'नाहीं, अजून लागली नाहीं;' दुसरा म्हणतो, 'होय, केव्हांच लागली.' ॐ म्हणा कीं नेति म्हणा, अर्थाचा नकारेंच आहे.

१८३. जग माझी प्रत्यक्ष सेवा करीत आहे आणि मी मात्र जगाच्या सेवेचे नांव घेत आहे. अजामिळ पापी नारायणाच्या नामाने उद्धरला. तसा सेवेच्या नांवावरच माझा उद्धार व्हावा असा ईश्वरी संकेत दिसतो. नाममहिमा अगाध आहे.

१८४. अद्वैत–'वाद' म्हणजे अचूक द्वैतसिद्धि.

१८५. स्वप्न म्हणजे झोपेंत जागणें आणि अवधान म्हणजे जागृतींत निजणें; पुष्कळवेळां हीं एकमेकांची कार्यकारणें असतात.

१८६. पादसेवन–भक्ति म्हणजे सर्व भूतांची सेवा. 'पादोऽस्य विश्वा भूतानि।'

१८७. निमित्तमात्र भव सव्यसाचिन्।' निमित्तमात्र होणें म्हणजे अहंकार सोडून देवाच्या हातांतलें हत्यार बनणें म्हणजे उजवा हात थकला तर डाव्या हातानें लढण्याची तयारी राखणें.

—सामर्थ्यामध्येंच खरे सुख आहे. जीवन म्हणजे हितकारक सुखाची अवस्था, पण दुर्बलपणा म्हणजे खऱ्या जीवनावर आघात आणि दुःख.

—हे शक्तीदेवते पार्वती माते, माझ्यांतील दुर्बलता व भीतीची भावना नष्ट करून मला खरा पुरुष कर.

—प्रभावी कृतीने उच्चदशा प्राप्त करून घेणे हेच जिवंतपणाचे व माणूसकीचे खरें लक्षण होय.

१८८. भक्त संसार, साधन आणि सिद्धि तिन्ही देवावर सोंपवितो.

१८९. आधि, व्याधि. उपाधि, समाधि–हें उपसर्ग–चतुष्टय.

१९०. शून्यता=एकता=अनंतता.

१९१. स्वरूप, विश्वरूप, अरूप ही देवाचीं तीन रूपें.

१९२. वेद–प्रामाण्य म्हणजे नीतिधर्माची निलता.

१९३. साधना कोठपर्यंत करावी ?

आपोआप 'होऊं' लागेपर्यंत.

१९४. हिमालय उत्तरेस कां आहे ?

मी त्याला उत्तरेस राहूं दिलें आहे म्हणून. मी उद्यां त्याच्या उत्तरेस जाऊन बसलों म्हणजे तो दाक्षिणेकडे फेकला गेलाच.

१९५. साधकानें स्वप्नावरहि चौकी राखली पाहिजे. आत्मसंशोधनाला त्याचा फार उपयोग आहे. हरिश्चंद्राचें उदाहरण.

१९६. निराहार, अल्पाहार, सहजाहार.

१९७. 'दुःखमित्येव' त्याग योग्य नाहीं. 'दुःखमिति' त्याग योग्य असूं शकेल.

१९८. सर्वधर्मान् 'परि'–त्यज्य मामेकं शरणं 'व्रज'। ही परिव्राजकाची भगवंतांनीं व्याख्या केली आहे.

१९९. कोणी म्हणतात, 'मनुष्य म्हणजे साधनवान् प्राणी.' मी म्हणतों, 'मनुष्य म्हणजे साधनावान् प्राणी.'

२००. सृष्टि म्हणजे एक अन्योक्ति आहे. दिसायला सृष्टि आणि असायला देव.

२०१. देह—शव.
आत्मा—शिव.
जीवन—स्मशान.

२०२ आपण संतांच्या चरित्राचें नव्हे, पण चारित्र्याचें अनुकरण केलें पाहिजे,

२०३. काव्याचे हेतु—
(१) हरीचें यश गाणें.
(२) जीवनाचा अर्थ करणें.
(३) कर्तव्याची दिशा दाखविणें.
(४) चित्ताचा मळ धुणें.

२०४. जी वाणी सत्याला संभाळते त्या वाणीला सत्य संभाळते.

२०५. उपपत्ति, प्रतीति आणि प्रीति; किंवा ऐकणें, पाहणें आणि जेवणें.




# एप्रिल १९६६

या महिन्यांत बाहेरगांवचे भक्तांची गर्दी बरीच होती. कांहीं कलाकारांनीं श्रीपुढें हजेरी दिली, ती खालीलप्रमाणें :—

**कीर्तन**

श्री. दत्तात्रय दामोदर ( तथा ) नानासाहेब रासने मु. पुणें. यानी श्रींचे पुढें श्री. अक्कलकोट स्वामी पुण्यतिथीनिमित्त व श्रीसंत भाऊमहाराजकुंभार पुण्यतिथी-निमित्त व एकादशी अशी कीर्तनें केलीं व शिर्डीस मुक्काम असेपर्यंत श्रींचे मंदिरात कीर्तन व भजन अशी सेवा चालूच असते. व श्री. रामनवमी उत्सवांतही गायन भजन सेवा केली. सं. गवई यांची कीर्तनें नेहमींप्रमाणें झालीं.

**गायन**

श्री. जयश्री शेजवाडकर परेल ( मुंबई ), श्री. कृष्णराव वऱ्हाडकर मुंबई, कु. यमुना गंगाधर टेंबे हुबळी, श्री. अनंत शांताराम कुलेंकर मुंबई, श्री. विठ्ठलराव मांजरेकर शिर्डी.

**व्हायोलिन वादन**

श्री. मधुकर शंकर केरकर, मुंबई

**तबलावादन**

श्री. दत्तोबा गुरव, शिर्डी

**मोठ्यांच्या भेटी**

[ १ ] राजे फत्तेसिंगराव भोसले, नागपूर.
[ २ ] राजे प्रतापसिंगराव भोसले, नागपूर.
[ ३ ] श्री. शिवाजीराव डी. देसाई, मुंबई.
[ ४ ] श्री. एन. वाय. नेने, पेण, जि. कुलाबा.
[ ५ ] श्री. एम. एस. यू. नायर, असिस्टंट डायरेक्टर ऑफ फूड, पूना.
[ ६ ] नामदार श्री. शंकरराव चव्हाण ( इरिगेशन् मंत्री महाराष्ट्र राज्य )

शिर्डी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई कांहीं नाहीं.

## Books published and Sold by Sai Baba Sansthan, Shirdi

### श्री साईबाबा संस्थान, शिरडी संस्थेतर्फे प्रकाशित व विक्रीकरितां ठेवलेली पुस्तकें

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (१) | श्रीसाईसच्चरित्र | (मराठी) | श्री. दाभोळकरकृत | ८-०० |
| (२) | ,, | (हिंदी) | श्री. ठाकूर | ४-५० |
| (३) | ,, | (गुजराथी) | श्री. सोमपुरा | ४-०० |
| (४) | ,, | (इंग्रजी) | Shri Gunaji | ४-०० |
| (५) | ,, | (Kannad) | N. S. Anantha Raum | ३-०० |
| (६) | **Glimpes of Indian Spirituality**– by Pradhan | | | १-०० |
| (७) | **Glimpes of Indian Spirituality** (Telgu) | | | १-०० |
| (८) | श्री साईलीलामृत | (मराठी) | श्री. आगास्करकृत | २-०० |
| (९) | साईबाबा-अवतार व कार्य | (मराठी) | श्री. धोंड | २-०० |
| (१०) | साईबाबांचे ४ अध्याय | (मराठी) | श्री. दासगणू | ००-५० |
| (११) | सगुणोपासना | (मराठी) | श्री. भीष्म | ००-२५ |
| (१२) | ,, | (गुजराथी लिपींत) | श्री. भीष्म | ००-२५ |
| (१३) | श्री रुद्राध्याय ११ वा | (मराठी) | श्री. दाभोळकर | ००-१२ |
| (१४) | श्री साई-सुमनांजली | (मराठी १०८ नांवें) | | ००-०६ |
| (१५) | कीर्तन पंचक | (मराठी) | श्री. देव | १-५० |
| (१६) | शालधी | (मराठी) | डॉ. गव्हाणकर | ००-७५ |
| (१७) | श्री साईगीतांजलि | (मराठी) | कवि श्रीपाद | ००-१२ |
| (१८) | **Guide to Shirdi** (English) | | | ००-१२ |
| (१९) | स्तवनमंजिरी व सुमनांजली | (मराठी) | | ००-२० |

### Colour pictures of Sai Baba by Neroy

| | | |
|---|---|---|
| (1) | Baba sitting on Stone 9½" × 13½" medium | **00-37** |
| (2) | ,, ,, in Dwarkamai 9½" × 13½" medium | **00-50** |

Other different poses of Sai Baba in colour according to different sizes varying in prices.

Commission to Sellers 25% except on 2 to 10 for which only 25 nP. and 50 nP. for No. 1 Postage Extra (minimum purchase of Rs. 15). *Can be had from* (मागवा):

1. **Executive officer Shri Sai Baba Sanstan,**
   P. O. Shirdi. Dst. Ahmednagar.
2. **Sai Baba Office 'Sai Niketan',**
   Dr. Ambedkar Road, Dadar, Bombay 14.



मालक : **श्री साईबाबा संस्थान, शिरडी,** आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४ करितां
प्रकाशक : श्री. जी. पोतनीस, मुंबई १४.